

श्रीसंत दासगणू महाराजांना पंढरपूरला जाऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. तेव्हा श्रीबाबांनी त्यांना तिथल्या तिथेच शिरडीत साक्षात् श्री पांडुरंगाचे असे दर्शन घडविले! आणि मग दासगणूंच्या तोंडून शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर या सुंदर अभंगाची निर्मिती झाली.

सप्टेम्बर १९८४)

(किंमत १ रु.

श्री साईनाथ वाचनालय

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६३ वे)　　किंमत १ रुपया　　(अंक ६

श्रीसाईलीला सप्टेंबर १९८४　　दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

संत स्वयें ठायींचे मुक्त ।
दीनोद्धरणीं सदैव उद्युक्त ।
अवतार तयांचा केवळ परार्थ ।
निजस्वार्थ त्यां नाहीं ॥१४॥

निवृत्ती पाया भरती ।
प्रवृत्तीच्या डोल्हाऱ्याभंवती ।
परमार्थाचें मंदिर उभारिती ।
भक्तां उद्धरिती सहजगती ॥१५॥

धर्मकार्य धर्म जागृति ।
करूनि अवतार कार्य संपादिती ।
होतां निजकार्य-परिपूर्ति ।
अवतार समाप्ति करितात ॥१६॥

सकल जगदानंद करू ।
प्रत्यगा त्माचि परमेश्वरू ।
जो परमेश्वरू तोचि गुरू ।
तोचि शंकरू सुखकरू ॥१७॥

तोचि तो निरतिशय-प्रेमास्पद ।
नित्य निरंतर अभेद ।
नेणे जो देशकाल वस्तुभेद ।
परिच्छेदातीत जो ॥१८॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय ४ था.

# सुविचार

दिनमेकं शशी पूर्णः
क्षीणस्तु बहुवासरान ।
सुखाद, दुःख सुराणामप्यधिकं ।
का कथा नृणाम ॥

देवांना सुद्धा सुखा पेक्षा दुःख अधिक भोगावे लागते तेथे माणसाची काय कथा ? महिन्यातील एकच दिवस चंद्राचे पूर्णबिंब असते इतर दिवशी तो क्षीण झालेला असतो.

★

# अनुक्रमणिका सप्टेंबर १९८४


| | |
|---|---|
| १. संपादकीय | — तमेव शरणं गच्छ |
| २. श्री योगीराज दत्तमहाराज | — सौ. पद्मावती वैद्य |
| ३. श्री साई उदीचे माहात्म्य | — डॉ. रा. श्री. कापडी |
| ४. दयामयी श्रीसाईबाबा | — सौ. उर्मिला जोशी |
| ५. शिरडीत अवतरला साईनाथ | — श्री. राजेंद्र कदम |
| ६. जरी हे शरीर | — सौ. प्रतिमा उमचिगी |
| ७. श्री बाबांविषयी एकचिंतन | — श्री शामराव जुवळे |
| ८. तसबीर | — श्री. ग. रा. पालकर |
| ९. भाझा जो जाहला | — श्री. उदय राऊत |
| १०. बाबा शिरडीत असताना | — श्रीसाईनंद |
| ११. दाता साई त्राता साई | — सौ. अन्नपूर्णा पवार |
| १२. भक्ती तेथें शक्ती | — सौ. उषाताई अधिकारी |
| १३. आमचा श्रीबाबांचा पुतळा | — श्री. व्ही. ए. किरपेकर |
| १४. श्रीबाबांनी कुणाकुणाला असे वाचविले | — श्री. माधव गोरे |
| १५. मनःशक्ती | — श्री. पां. शं भुजबळ |
| १६. श्रीसाई चरणी प्रणाम | — सौ. शैला पुरव |
| १७. तारणकर्ते श्रीसाईबाबा | — सौ. सुलोचना जोशी |
| १८. उदी नव्हे अमृतवल्ली | — श्री. म. कृ. विचारे |
| १९. साई मला दिसले | — श्री. दा. र. दळवी |
| २०. औक्ष वाढो कुंकवाला | — सौ. रश्मी कोरे |
| २१. साईराया माझी माया | — श्री नथुराम जोशी |
| २२. पाहिली शिरडीतली पंढरी | — कु. रक्षा वागळे. |
| २३. समाधी मधूनी जागे व्हा | — श्री. के. पी. पहाडे |
| २४. नमस्कार | — सौ. सुनिता विचारे |
| २५. सबका मालिक एक | — सौ. भावना जेऊरकर |
| २६. नित्यनेम | — श्री. यशवंत विचारे |
| २७. श्रीसाईबाबांची प्रार्थना | — श्री. सूर्यकांत मयेकर |
| २८. जगाचे अधिपती | — श्री. बाळासाहेब नाडकर्णी |
| २९. शिरडीवृत्त | — जून १९८४ |


४४ ४४ ४४

# तमेव शरणं गच्छ

स. न. वि. वि.




"तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शांति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।"

या श्लोकातून भगवंताने ईश्वर शरणांगतीचे अलौकीक फल प्रतिपादन केलेले आहे.

भगवान सांगतात की हे 'अर्जुना', ईश्वर मी सर्व प्राणीमात्रांच्या हृदयात स्थित आहे. अर्थात ईश्वर व्यापक आहे. पृथ्वी, वायु, तेज, जल, आकाश चंद्र, सूर्य, स्थिर आणि अस्थिर पदार्थ व्यापून तो दशांगुळे उरलेला आहे. आणि मायेच्या यंत्रावर सर्व प्राणीमात्रांना आरूढ करून आप-आपल्या सर्व कर्माप्रमाणे जन्ममृत्यूच्या दुर्धट वाटेने त्यांना आग्रहाने फिरवितो. याचा अर्थ असा ईश्वर सर्वांच्या आत राहून जीवांना पूर्व कर्माप्रमाणे फले देतो. 'अर्जुना' जर तुला पूर्व कर्मातून सुटका करून जन्ममृत्यूच्या चक्रात फसायचे नसेल, जिवंत असतानां दुःखाची आत्यंतिक निवृत्ती करून परमानंदाची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर हे 'अर्जुना' तू

"तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांति स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥"

याचा अर्थ असा हे 'अर्जुना' त्या परमेश्वरालाच तू कायेने, वाचेने, मनाने आणि धनाने शरण जा. त्याच्या प्रसादाने श्रेष्ठ शांतिची प्राप्ती होऊन शाश्वत" स्थानाला तू प्राप्त होशील.

'तम् एव :'- त्या ईश्वराला म्हणजे कोणत्या "ईश्वराला" ? ज्याचे चारवेद, सहाशास्त्रे आणि अठरा पुराणे, रामायण, महाभारत, भागवत आदी स्मृती ग्रंथ त्याच प्रमाणे तुकारामादी संत वर्णन करतात, की जो निर्गुण, निराकार, निर्विकल्प, निरंजन, नित्य, शुद्ध, सच्चिदानंद हेच ज्याचे स्वरूप लक्षण आहे, तसेच जो सगूण आहे, साकार आहे, 'राम, कृष्ण, विठ्ठल.' आदी रूपाने जो आहे त्या ईश्वराला 'शरणं गच्छ' । :

ईश्वराला शरण जाणे म्हणजे ईश्वराचे अस्तित्व मानणे. तसेच डोळ्याने परमेश्वराचे रूप पहाणे. कानाने परमेश्वराचे गुण, किर्ती, नाम प्रेमाने ऐकणे जिव्हेने 'राम' रसाचे सेवन करणे, वाणीने वेदशास्त्राचा अभ्यास करणे. पायाने तीर्थयात्रा करणे, हाताने परमेश्वराची पूजा करणे, कायेने भगवंताच्या चरणावर लोटांगण घेणे, मस्तक परमेश्वराच्या चरणी लीन करणे, मनाने परमेश्वरा-बद्दल योग्य संकल्प करणे, बुद्धीने परमेश्वर स्वरूपाचा निश्चय करणे, चित्ताने चिंतन करणे आणि मी हरीचा दास आहे असा अहंकार घेणे यालाच म्हणतात परमेश्वराचे कर्तृतंत्र शरणांगती.

दुसरी शरणांगती वस्तुतंत्र आहे. अर्थात् मी परमात्माच आहे असा बोध प्राप्त करून घेणे ही सर्वात श्रेष्ठ शरणांगती आहे. माणसाने शक्यतो हीच शरणांगती पत्करावी. तात्पर्य मनुष्याने यथा अधिकार कर्म, उपासना आणि ज्ञान मिळविण्याकरीता अंतःकरणापासून प्रयत्न करणे यालाच म्हणतात परमेश्वराला सर्व-भावाने शरण जाणे. काही लोक कायेने शरण जातात परंतु वाचेने आणि मनाने जात नाहीत. काही लोक वाचेने शरणांगती करतात परंतु मनाने करीत नाहीत तर मनाने करून सुद्धा धनाने करीत नाहीत. धनाने सेवा करणे म्हणजे सत्कार्यामध्ये अर्थात् किर्तनाला, प्रवचनाला, सप्ता-हाला, तीर्थाला पैसे खर्च करणे.

## "तद् प्रसादात"

अर्जुनाने भगवंताला विचारले की परमेश्वराला शरण गेल्याने कोणत्या फलाची प्राप्ती होते. त्याचे उत्तर या श्लोकाच्या उत्तरार्धात आहे. परमे-श्वराची कायेने, वाचेने, मनाने आणि धनाने सेवा केल्यानंतर अंतकरणा-तील स्वाभाविक मलाची निवृत्ती होते म्हणजेच पाप करण्याची सूक्ष्म वासना नाहीशी होते. आणि हे काम अनेक जन्म परमेश्वराची, साधूची सेवा केल्याने होते. मागच्या अनेक जन्मामध्ये वेदाच्या आज्ञे प्रमाणे वागल्याने, शास्त्रा च्या चालीने चालण्याने पुराणाचे अनुसरून केल्याने स्मृत्यादी ग्रंथाचा पाठींबा स्वीकारल्याने संताच्या पाउलावर पाऊल दिल्याने शेवटी ईश्वराच्या प्रसादाने अंतकरणातील मल आणि विक्षेप म्हणजे विषयाची सूक्ष्म वासना अर्थात् आपण ज्याला चंचलता म्हणतो त्याची निवृत्ती होते, आणि मनुष्य विवेक वैराग्य षमादीषट्क आणि मुमुक्षुत्व यांनी युक्त होऊन श्रोत्रीय, ब्रम्हनीष्ठ दयाळू सद्गुरुकडे ब्रम्हज्ञान प्राप्ती करीता तो सद्गुरूची कायेने, वाचेने, मनाने सेवा करून त्यांच्या प्रसन्नते द्वारा अहम्, ब्रम्हास्मी म्हणजे मी ब्रम्ह,

आहे. अशा अवस्थेला तो प्राप्त होतो, आणि त्याने अज्ञानाची निवृत्ती होते आणि दुःखाची आत्यंतिक निवृत्ती त्या बरोबर होऊन जाते. या गोष्टी ईश्वराच्या कृपा–प्रसादाशिवाय होत नाहीत.

## "स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्"

आता ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याचं असाधारण फळ सांगतात. शाश्वत स्थानाची 'अर्जुना' तू प्राप्ती करून घेशील म्हणजे परमानंद पदाला प्राप्त होशील. याचा अर्थ असा की जीवंत असताना दुःखाची कारणासह निवृत्ती होऊन ब्रम्हानंद प्राप्त होईल, आणि हेच स्थान शाश्वत आहे. बाकीचे कोणतेही स्थान शाश्वत नाही. सरपंच झाला, जिल्हाध्यक्ष झाला, मुख्य मंत्री किंवा राष्ट्राध्यक्ष जरी झाला तरी ते स्थान शाश्वत नाही. नव्हे..नव्हे ब्रम्हदेव, इंद्र, चंद्र, यम, वरूण, कुबेर आणि आणखी जरी आपण स्वर्गातील देवतांचे स्थान आपण प्राप्त करून घेतले तरी पुण्यक्षयाने त्या स्थानाहून भ्रष्ठ व्हावे लागते. का तर कर्मजन्य फलाचा असा नियम आहे की ते फल शाश्वत नसते. परंतु ज्ञानाने प्राप्त झालेले जे फल असते ते शाश्वत असते. अर्थात् त्या फलापासून कोणीही कोणाला च्यूत करू शकत नाही. त्याच स्थानाला, मोक्ष, देवाची भेट, मानवजन्माचे साध्य, मानवाचा अंतिम मुक्काम, अति–मानवता, जीवन मुक्ति वगैरे नावे आहेत, आणि मनुष्याने जन्माला आल्यानंतर या उत्तम स्थान प्राप्तीची संधी केव्हाही दवडू नये. इतर योनीमध्ये अशा स्थानांची प्राप्तीच करून घेऊ शकत नाही. या योनीतच ही गोष्ट साध्य आहे. असा शास्त्र सिद्धांत भगवान, अर्जुनाला मोठ्या प्रेमाने 'स्थानम् प्राप्स्यसी शाश्वतम्' या पदाने सांगतात.

तात्पर्य मनुष्याने आहार, निद्रा, भिती, मैथून यात सक्त न होता जीवनावश्यक तेवढ्या क्रियेत गुंतून आपल्या अमौलीक मनुष्य देहाचा काल परमेश्वराच्या सेवेत घालवावा अशी 'भगवान' आज्ञा देतात.

तमेव शरणं गच्छ । सर्व भावेन भारत ।

---

श्रीसाईलीला येत्या अक्टोबर १९८४ चा अंक हा **दसरा–दिवाळी विशेषांक** म्हणून प्रकाशित होईल व नव्हेंबर–डिसेंबरचा जोड अंक हा भक्त अनुभव विशेषांक म्हणून प्रकाशित होईल. **– का. संपादक**

# दत्तमहाराज यांचे चरित्र

—सौ. पद्मावती वैद्य, मुंबई.

० थोर विभूती सुद्धा पुण्य स्थानातच अवतीर्ण होतात. दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर उर्फ करवीर म्हणून पुण्य क्षेत्र आहे. या करवीर क्षेत्री वारणा नदीचे काठी "वठार" म्हणुन एक लहान गाव आहे. वठारगावी प. पू. सद्गुरु श्रीदत्तमहाराज यांचा जन्म झाला. वठार गावचे कुलकर्णी श्री. रा. वासुदेवराव दिवाण हे श्रीदत्त महाराजांचे पिता होत, व श्री. राजारामपंत इनामदार यांची कन्या सौ. मुक्ताबाई ह्या महाराजांच्या मातोश्री होत. श्री राजारामपंत व सौ. मुक्ताबाई यांचे सात्विक प्रेम होते. त्यांचा संसार आनंदात चालला होता. श्री दत्तप्रभूंचे चरणी त्या दोघांचे लक्ष् असल्यामुळे प्रभूंनी त्यांचेवर कृपाछाया करावयाचे ठरवले असावे. कुणी थोर विभूती जन्माला येणार याची चिन्हे दिसू लागली. सौ. मुक्ताबाईना पहिली दोन अपत्ये झाली होती. आता ह्या तिसऱ्या खेपेस त्यांना वेगळाच आनंद होत होता. त्यांचे कुलात सूर्यउपासना सतत चालू होती. हळूहळू मुक्ताबाईचे संपूर्ण दिवस भरत आले होते.

शके १८१६ आश्वीन शुद्ध १ प्रतिपदेच्या दिवशी रविवारी मध्य रात्रीनंतर १ वाजून २१ मिनिटांनी त्यांनी पुत्ररत्नास जन्म दिला. ह्या पुत्ररत्ना कडे पाहून माता व पिता आणि इतर सर्व परिवारास अवर्णनीय आनंद झाला होता. १२ वे दिवशी बारसे केले व ह्या बाळाचे नांव "नरहरी" असे ठेवण्यात आले हेच "नरहरी", पुढे श्री दत्तमहाराज म्हणून प्रसिद्धीस आले.

वयाच्या आठवे वर्षी त्यांची मुंज करण्यात आली. नरहरी ११ वर्षांचा झाला. त्याच वेळी त्यांचे वडील श्री. राजारामपंत हे वारले. नरहरीचे शिक्षण फक्त चार पाच इयत्ता झाले होते. १३ वे वर्षी त्यांनी ठरवले की आपल्याला आता नोकरी करायला हवी. म्हणून ते प्रथम पायी-पायीच सांगलीला गेले. नोकरी करण्यास म्हणून गेले खरे पण त्यांचा सारा कल परमार्थाकडे होता. त्यांना त्याची अत्यंत ओढ होती. सांगलीत गेल्यावर त्यांना कळले की, नरसिंहवाडीस कोणी श्री वासुदेवानंद सरस्वती म्हणून मोठ अवतारी पुरुष

आले आहेत. म्हणून लगेचच दत्तमहाराज त्यांचे दर्शनाला वाडीला गेले. दत्तमहाराजांनी त्यांचे दर्शन घेतले व त्यांना फार आनंद वाटला. मग ते वाडीलाच श्री वासुदेवानंद यांचे सहवासात राहू लागले. स्वामीची सेवा व दर्शनसुख घेत थोडे दिवस वाडीला काढल्यावर दत्तमहाराजांनी गाणगापूरला जायंच ठरवले. स्वामीचे दर्शन घेवून सरळ ते गाणगापूर येथें गेले. गाण–गापूर हे भीमा अमरजा संगमावरचे रमणीय क्षेत्र आहे. तेथे श्रीदत्त गुरूचे साक्षात् अस्तित्व आहे.

अशा एकांत स्थळी झोपडीत रहावयाचे व भिक्षा मागून खायचे व श्री दत्त सेवा करायची, असा त्यांचा क्रम सुरू झाला. पुढे त्यांना कॉलरा झाला. त्यांना इतके त्याने व्यापले की पंचप्राण व्याकूळ होवून, नरहरी, म्लान होवून मृत्यूच्या दारात पडला. रात्री श्रीदत्त प्रभूंनी येवून त्यांना दर्शन दिले, आणि म्हणाले बाळ भिऊ नकोस हे तीर्थ घे आणि स्वहस्ते त्यांना तीर्थ पाजले. व सांगितले की भांड्यात तीर्थ ठेवलंय ते रोज थोड थोड घे. म्हणजे लौकर बरा होशील व बरं वाटल्यावर घरी जा तुझी आई वाट पहात असेल तू अजून लहान अहिस. इतके बोलून श्री दत्तप्रभू अंतर्धान पावले. नरहरीला जाग आली उठून पहातो तो तिर्थाचे भांडे शेजारीच होते. ते पाहून नरहरीला गहिवरून आले. श्रीदत्तप्रभूंच्या कृपे बद्दल धन्यता वाटली. हळू–हळू बरं वाटल्यावर नरहरी परत घरी आई कडे आला. पण तेथे ते घरी न रहाता श्रीदत्त मंदिरात राहू लागले. त्या नंतर त्यांनी कृष्णा प्रदक्षिणा केली. कृष्णा प्रदक्षिणा करायची तर दाट अरण्यातून जावे लागते. त्यातला एक त्यांचा अनुभव इथे नमूद करावासा वाटतो. सद्‌गुरूचे स्मरण करत करत दाट अरण्यातून जात असता एकेदिवशी गर्द छायेतून एक वाघ वाटेवर आला, व त्यांचेवर किरण त्याने धरले. वाघाने किरण धरले तेव्हा आता आपला देह जाणार असे वाटले. मग गुरूमाउलीचे स्मरण करून घट्ट डोळे मिटले. थोड्या वेळाने वाघ परतून झाडीत निघून गेला. संकटाचे निवारण सद्‌गुरूंचे कृपेमुळे झाले असल्यामुळे धन्यता म्हणून पुन्हा त्यांनी मार्ग क्रमण सुरू केले. एवढ्या कष्टाने कृष्णा प्रदक्षिणा पुरी करून महाराज परत आले. परत आले ते तंजावर येथे राहिले. ते तेथे श्री टेंबे स्वामींच्या मठात रहात असत. तपाचरण अत्यंत पवित्र वैराग्य, आनंदी स्वभाव, योगनिष्ठा, ह्या मुळे कीर्ती–परिमल हळूहळू सर्वत्र पसरू लागला. दत्तमहाराज मूर्तीमंत प्रेमाची मूर्ती असल्यामुळे सर्वांचे ठिकाणी प्रेम करावे अशी त्यांची शिकवण होती. ईश्वर

सर्वत्र भरला आहे. म्हणून सर्व जिवावर प्रेम करावे असा उपदेश ते करत असत पुढे ३ वर्षे तंजावर येथे राहून महाराज महाराष्ट्रात परत आले.

कोल्हापूर जवळ इस्लामपूर म्हणून गांव आहे. तेथे डॉ. श्री. म. वैद्य (भाऊराव) हे फार अधिकारी विभूती होवून गेले. डॉ. भाऊरावांचेवर पू. महाराजांचे फार प्रेम होते. त्यांच्या घरीच ते इस्लामपूरला आले की रहात असत. त्यांचेकडे श्री दत्त या वर श्री दत्तमहाराजांची प्रवचने महात्म होत असत. भाऊरावांचा परमार्थात फार अधिकार होता. डॉक्टर व्यवसाय असल्यामुळे सर्वांशी अत्यंत प्रेमळ वागणूक असे. त्यांचेवर सर्व गावाचा विश्वास होता.

श्री. पू. दत्तमहाराज आले की दर्शनाला सारा गाव लोटायचा. इसलामपूर गावाचे पण पू. महाराजांचेवर फार प्रेम होते, आम्हा मुलांना ते आसने, स्तोत्रे, आरत्या वगैरे शिकवत असत. त्यांचे जवळ एक दत्ताची मूर्ती होती. मूर्ती फारच सुंदर व हसत मुखी आहे. पू. दत्तमहाराज फार प्रेमळ होते त्यांचे बद्दल कितीही लिहिले तरी संपणार नाही. मी लहानपणी त्यांना प्रत्यक्ष पाहिलेले आहे. त्यांनी आपला समाधी काल कित्येक दिवस अगोदर पुष्कळ लोकांना सांगितला होता. अष्टे मुक्कामी ते शेवटी रहात होते, तेथे तारदाळ–कर यांचे ओटीवर त्यांचे वास्तव्य होते. सौ. तारदाळकर ह्यांना ते आई मानत होते. ती दोघे आता हयात नाहीत. त्यांचे घरीच ठरल्या दिवशी स्नान संध्या करून पू. दत्तमहाराजांनी समाधी लावली. शके १८४५ फाल्गुन शु. ६ गुरुवारी सायंकाळी आसनावर बसून 'ब्रम्हरंध्र' ला भेदन करून त्यांनी विदेह मुक्ती घेतली. सर्व मंडळींना खूपच दुःख वाटले. डॉ. भाउराव वैद्यांना पू. महाराज गेल्या मुळे फार दुःख झाले.

त्याच अष्टे गावात सर्व भक्तांनी मिळून त्यांचे समाधी मंदिर बांधले आहे. समाधीवर श्रीदत्तमूर्ती स्थापन केलेली आहे. खाली त्यांचे गुरूमाउलीचा फोटो आहे. मंदिर अत्यंत शांत आहे कुणालाही अष्टे मुक्कामी जाऊन समाधीचे दर्शन घ्यायचे असेल, तर जरूर अष्टे येथे जाऊन दर्शन घ्यावे. अश्वीन शुद्ध प्रतिपदेला त्यांचा जन्मोत्सव करतात. आणि पुण्य तिथीचा उत्सव दर–साल फाल्गुन शुद्ध ६ ला करतात. श्री. तारदाळकरांचे नातू योगिराज हे तेथील सर्व व्यवस्था करतात.

★

# साईच्या उदीचे महात्म

—डॉ. रा. सी. कापडी
कोल्हापूर.

**रमते राम आयोजी आयोजी ।**
**उदियांकी गोनियां लायोजी ॥**

शिर्डीचे साईबाबा प्रेमात आले म्हणजे वरील पद्याचा एकच चरण घोळन घोळून भजनाच्या चालीवर म्हणत असत. भस्म, रक्षा, अंगारा, विभूती आणि उदी हे पांच शब्द अर्थाने समान आहेत. भगवान कैलासपती श्रीशंकर अंगाला रक्षा फासून स्मशानात वसत असत. त्यांचेच अनुकरण थोरथोर ऋषी मुनींनी केलेले आहे. रक्षा फासली म्हणजे थंडी वाऱ्या पासून देहाचे रक्षण होते. हा देखिल त्यातील हेतू असल्यामुळे अनेक गोसावी राख फासून थंडी वाऱ्यातून फिरताना दिसतात.

लिंगायत पंथात विभूतीला महत्व आले. लिंगायत पंथीय जंगम लोक आमच्या लहानपणी शिधा गोळाकरण्याकरता जेव्हा घरोघर येत त्यावेळी अंगाऱ्याची पुडी हातावर ठेवून अंगारा आमच्या कपाळाला लावीत. त्यामुळे भूत बाधा होत नसे, सर्प चार हात दूर पळत असत असा समज होता.

माथा शोभे जटाभर । अंगी विभूती सदर ! हे तुकाराम महाराजांच्या अभंगातील कडवे दत्ताचे वर्णन करताना म्हटले आहे त्यामुळे विभूती हा शब्द फार प्राचीन काळापासून रूढ असावा.

विभूती आणि उदी दोन्ही शब्द समान आहेत. पण शिर्डीच्या साई बाबांच्या अवतारा पासून सर्वांच्या तोंडी विभूती ऐवजी उदी हा शब्द प्रसिद्धीस आला. कर्नाटकातील अलिकडचे संत सत्य साईबाबा हे आपल्या सिद्ध हस्ताने उदी काढून देतात. पुट्टपूर्तीला प्रशांत निलयम नावाचे जे एक प्रार्थना मंदिर बांधले आहे त्यांत बसविलेल्या शिर्डीच्या साई बाबांच्या मूर्तीवर दसऱ्याच्या दिवशी हस्त कौशल्याने उदीचा अभिषेक करतात असे मी वाचले आहे.

अलिकडे शिर्डीच्या साई बाबांचे महात्म भारताच्या सर्व लहान मोठ्या शहरातून एवढेच नव्हे खेडोपाडी काना—कोपऱ्यातून वाढले असल्यामुळे बाबां—

ची उदी प्रत्येक भक्तांच्या घरात प्राणप्रिय झाली आहे. साईबाबांची उदी भक्तांच्या घरात सापडणार नाही असे एकही घर दिसणार नाही.

उदीयांकी गोणीयां लायोजी। असे जे सुरवातीला म्हटले आहे ते अगदी खरे आहे. मशिदीत जिला साईबाबांनी भक्ती भावाने द्वारकामाई हे नांव दिले तेथे रात्रंदिवस अखंड प्रज्वलीत असलेली धुनी किती गोणी प्रसविली याची मोजदादच होणार नाही. गंगेच्या झऱ्याप्रमाणे दररोज उदी तयार होते तेवढी संपूनही जाते.

बेळगांव नजीक दत्ताचा अवतार बाळकुंद्रे महाराज यांनी स्थापन केलेल्या संस्थानाच्या परिसरात अशी अखंड प्रज्वलीत असलेली धुनी मात्र माझ्या पहाण्यात आली आहे. त्याशिवाय इतर कुठल्याही मंदिरात हे अग्नी-होम सापडणार नाही. पारशांच्या धर्ममंदिरात मात्र असे अग्नी होम सतत पहाण्यात येते.

द्वारकामाईत धुनी सतत पेटलेली असावी असा साईबाबांचा मानस असावा कारण शिर्डीच्या आसपास एकदा महामारी (कॉलरा) जोराने सुरु झाली होती. त्यावेळी शिर्डीवासियांनी बाबांच्या विचाराशिवाय बाहेरची कोणतीही वस्तु शिर्डीच्या वेशीतून आत आणण्याची मनाई केली. त्यावेळी धुनीची काष्ठ संपण्याचा संभव आला. अशावेळी बहुधा बाबाच्या प्रेरणेने एक लाकडाने भरलेला गाडा वेशीवर आला. गावकऱ्यानी गाडा आत आण-ण्यास मनाई केली. बाबांना ही बातमी लागताच बाबांनी आपले आसन सोडले आणि वेशीवर आले. बाबांना मनाई करण्याची कोणाची छातीच नव्हती गाडी मशिदीकडे आणून लाकडे उतरून घेतली. योग्य ती किमत त्या गाडी-वानाला मिळाली.

खरे म्हणजे बाबांनी शिर्डी हे वसतीस्थान केल्यापासून शिर्डीत कोण-त्याही रोगाची महामारी, ग्रंथीज्वर वगैरे ची साथ पसरलेली कोणीही सांगू शकत नाही कारण सुरवातीलाच स्वतः गहू दळून त्याचे पीठ जमलेल्या बायांकडून ओढ्यात टाकून प्रवाहावाटे ते वाहू दिले याचा अर्थ असा की ? महामारी भरडून गव्हाच्या पीठाच्या द्वारे ओढ्याच्या पाण्यातून हाकून लावली. पुनः महामारीच काय कोणत्याही साथीची लागण शिर्डीत झाली नाही. साईबाबांचे शिर्डीगांवावर अमाप प्रेम हेच या गोष्टीवरून दिसून येते. बाबांनी शिर्डीला पंढरपूरापेक्षा जास्त महात्म आणले. साईबाबांच्या निर्वाणानंतर तर भारतीयांच्या सर्व धर्म पंथीयांची दररोज जत्रेप्रमाणे रिघ लागलेली आहे.

माधवराव देशपांडे ज्यांना लाडीक नावाने बाबा शामा म्हणत त्यांना एकदा सर्पदंश झाला. तो तावडतोब बाबांकडे धावला. तो मशिदीची पायरी चढणार इतक्यात नारसिंह अवतार घेऊन बाबा ओरडले "खबरदार भट्टुरड्या वर चढलास तर, चल नीघ खाली उत्तर" शामा घाबरला माऊलीकडे धावत आलो तीच माऊली झिडकारीत आहे. आता धाव कोठे घ्यायची ? तो क्षण-भर बाबांकडे पहात राहिला धीर करून वर चढून त्याने बाबांचे पाय धरले तावडतोब त्याच्या वेदना कमी झाल्या. वीष उतरले बाबांनी, त्याची समजूत घातली तू लहानपणी एका ब्राम्हणाच्या पोराला खूप चोपले होतेस त्याला आज मेल्यावर सर्प योनी प्राप्त झाली आहे. त्याला उद्देशून माझे सारे शब्द होते ही उदी घेऊन सर्पदंशाच्या ठिकाणी चोळ व पाण्यात घालून तीर्थ म्हणून प्राशन कर जा स्वस्थ रहा.

असाच माधरावाच्या भावाच्या भावजयीवर प्रसंग आला होता. ती शिर्डीबाहेर साऊल विहीर नावाच्या निवासस्थानी रहात होती. अपरात्रीच माधरावाचा धाकटा भाऊ शिर्डीस आला. त्याच्या पत्नीला प्लेगच्या गाठी उठल्या होत्या. ताप १०६ डिग्री होता. बाबांनी त्याला उदी देऊन परत पाठविले. त्याने उदी पाजून अंगाला चर्चून लावताक्षणीच घाम येऊन ताप निघाला प्लेगच्या गाठी जिरून गेल्या.

एकदा बाबांचे परमभक्त नानासाहेब चांदोरकर हे जामनगरला मामले-दार असतानां त्यांची मुलगी प्रसूती वेदना सहन न होऊन ओरडू लागली. पहिल्याच बाळंतपणी तिला घरी आणली होती. नानासाहेबांनी नवचंडिका यज्ञ सुरू केला आणि बाबांना आर्त स्वराने हाक मारली.

॥ अनन्या श्चिंतयन्तो मां येजना पर्युपासतेऽऽ ॥

या भगवंताच्या गीतेतील श्लोका आधारे नानासाहेबांनी मारलेली हांक फुकट कशी जाईल ?

साईबाबांनी तर येथे मोठाच चमत्कार केला. त्याचवेळी खानदेशात जाणाऱ्या एका भक्ताजवळ उदी च आरती—आरती साईबाबा ।

सौख्य दातारा जीव ही उतरून देऊन नानासाहेबांकडे पाठविले.

आज बालाजीच्या तिरूपती खालोखाल शिर्डी हे आर्थिक दृष्ट्या श्रीमंत क्षेत्र आहे.

## बाबांच्या उदीमुळे घडून आलेले चमत्कार

जे आत्मसाक्षात्कारी किंवा तत्व दर्शनीसंत आहेत. त्यांना सर्व सिद्धी आपोआप प्राप्त झालेल्या असतात. त्यांच्या घरी सर्व सिद्धी पाणी भरीत असतात. त्यांचा शब्द हीच सिद्धी.

ज्ञानेश्वर माऊलीने रेड्याकडून वेद वदविले. तीनशे वर्षानंतर एकनाथ महाराजांनी देवळातील नंदीच्या जड मूर्तीकडून चारा खाण्यास लाविले. आणखी तीनशे वर्षांनी रामदास स्वामीने एका दलीताकडुन रेषा ओलांडून आपले पूर्वायुष्याची जाणीव करुन दिली, असले चमत्कार देव अवताराशिवाय होत नाहीत.

अलिकडील तीनशे वर्षानंतर अक्कलकोट महाराज, सिद्धारुढ, साई बाबा, टेम्बे महाराज, पाटगावचे दादा महाराज वगैरे संत वरील कोटीतीलच होते व आहेतही.

साईबाबांच्या उदीने घडवून आणलेले चमत्कार सहजासहजी घडत आलेले आहेत. उदीवर निष्ठा जडावी हा त्यामागील मूळ हेतू असून साई बाबांनी धुनी मार्फत हजारो गोणी उदी निर्माण केल्या व अजूनहि करीत आहेत. साईबाबा दररोज दोनप्रहरच्या आरतीनंतर स्वतः आपल्या हाताने जमलेल्या भक्तांना प्रसाद देत असत. त्याच प्रमाणे निरोप देताना भक्तानां उदी देण्यात येई. किंबहुना उदी दिल्यावरच शिर्डी सोडण्यास परवानगी मिळाली असे समजण्यात येई. रोगाने पिडीत संकट ग्रस्त लोकांना उदी देऊन सर्वांना चर्चून पाण्यातून पिण्यास देऊन, बाबा त्यांच्या आपदा नाहीशा करीत व उदीवरील श्रद्धा दृढ करीत.

नानासाहेबाकडे पाठविलेला भक्त रामगीर गोसावी याला अपरात्री चाळीस गावच्या स्टेशनावर उतरावे लागले. तेथे टांगेवाल्याच्या रूपाने बाबा प्रगट होऊन टांग्यात बसवून जाताच नानासाहेबांच्या वाड्यावर सोडून आपण गुप्त झाले. रामगीर गोसाव्याने आणलेली उदी अंगाला लावून पाजण्यास देताच मुलगी सुखरूप सुटली सर्वत्र आनंदीआनंद झाला. नानासाहेब चांदोरकर नी हे मनोमय जाणले. बाबांच्या या लीलेबद्दल साश्रुनयनाने कौतुक करीत त्यांनी शतचंडी यज्ञ पूरा केला.

द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी पांचाळीने श्री कृष्ण परमात्म्याला मारलेल्या हांकेप्रमाणेच ही नानासाहेबांची हाक होती. असल्या हांकेला भगवंत "येषां नित्याभियुक्तांनां योगक्षेत्र वहाम्यहम"। या गीतेतील श्लोकाप्रमाणे भक्तांचे भगवान लाड पुरवितो.

ह्या उदीच्या दोन चमत्कारा च्या गोष्टीवरून सर्वांची खात्री पटेल की उदीने अनेक चमत्कार घडविले आहेत व अजूनहि घडत आहेत.

दादासाहेब खापर्डे यांच्या मुलाला शिर्डीला येण्यास निघाले असता वाटेत प्लेगच्या गांठी उठल्या त्या मुलाची आई घाबरी घुबरी झाली. बाबांनी आपली कफनी वर उचलून दाखवली त्या ग्रंथी आपल्या अंगावर घेऊन उदी पाजून मुलाच्या अंगावरील गांठी नाहीशा केल्या.

मुंबईचे प्रसिद्ध कादंबरीकार नाथ माधव यांच्या तांबे घराण्यातील मुलाच्या अपस्काराच्या फीटस उदीने बऱ्या केल्या. हाडज्यावर्ण, मूतखडा, नारू कफक्षय, पोटातील गांठ वगैरे शारीरीक व्याधी भूतबाधा वगैरे दैविक उपाधी बाबांच्या उदीने नाहीशा झालेली अनेक उदाहरणे आहेत. साईसच्चरितांतील अध्याय ३३, ३४, ३६ मध्ये ती वाचकांनी वाचून आपली खात्री पटवून ध्यावी.

माझ्या एका मित्राच्या दोन्ही पायावर दीर्घकाळ इसब झाला होता. त्याने उदी पाण्यात कालवून पिऊन व त्या जागेवर वारंवर घासून रोगमुक्त झाला. बाबांचे पट्टशिष्य नाना चांदोरकर यांनी हाता जवळ उदी नसताना उदीच्या ऐवजी रस्त्यावरची माती उचलून बाबांच्या नांवाने कपाळाला लावून रोग्याला रोग मुक्त केला. बाबांच्या फोटोच्या चरणाजवळ लावलेल्या उदबत्तीच्या राखीने विंचू दंश बरे केलेली उदाहरणे आहेत.

## श्रीसाईलीला संस्थानचे कार्यकारी अधिकारी

श्री साईबाबा संस्थानाचे कार्यकारी अधिकारी म्हणून उपजिल्हाअधिकाऱ्यांच्या वरिष्ठ श्रेणीतील अधिकारी श्री. आर. डी. वन्ने यांची नेमणूक सेवानिवृत्तीनंतर करण्यात आली असून त्यांनी आपल्या पदाची सूत्रे दि. १–८–८४ रोजी हाती घेतली आहेत.

श्री. वन्ने हे कोल्हापूरचे रहिवाशी आहेत मुंबई विद्यापीठाची पदवी परिक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले नंतर त्यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. निरनिराळ्या जिल्हयात उपजिल्हाधिकारी म्हणून काम केले. पुणे येथे निवासी उपजिल्हाअधिकारी व अॅडशिनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट म्हणून प्रदीर्घ काळ काम केले आहे. ते प्रथम पासून धार्मिक वृत्तीचे आहेत. त्यांच्या आजवर झालेल्या उत्कृष्ट सेवेचा व ज्येष्ठतेचा विचार करून सरकारने शिरडी संस्थानाचा कारभार समर्थपणे व कार्यक्षमतेने सांभाळवा या दृष्टीने त्यांची कार्यकारी अधिकारी म्हणून मुद्दाम निवड केली आहे.

## माखीजानी साहेबांचे निधन

मा. श्री. एन. आय. माखीजानी, जज्ज, सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांचे दिनांक ४–८–१९८४ रोजी अल्पशा आजाराने मुंबई येथे आकस्मात दुःखद निधन झाले. श्री साईबाबा संस्थानचा कारभार मा. श्री. माखीजानी साहेब यांचे अधिपत्याखाली चालू होता.

मा. श्री. माखीजानीसाहेब हे एक निस्सीम साईभक्त होते. संस्थानच्या कारभाराच्या प्रत्येक बाबतीत आस्थेने लक्ष घालून साईभक्तांची जास्तीत जास्त सुखसोय करणे व संस्थानचा विकास या बाबत सदैव प्रयत्नशील होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व आदेशानुसार संस्थानची भरभराट तर झालीच तसेच साईभक्तांच्या सुखसोयीही वाढविल्या गेल्या.

त्यांच्या निधनाने एक निस्सीम साईभक्त, कुशल प्रशासक, मनमिळाऊ स्वभावाचे उमदे व्यक्तिमत्व हरवले आहे.

त्यांच्या दुःखद निधनानिमित्त कार्यालयांना सुट्टी देण्यात येऊन मा. नामदार श्री. एन. के. पारेख, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांचे उपस्थितीत शोकसभा घेण्यात आली. शोकसभेत मा. पारेख साहेब, संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब, कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. वन्ने साहेब व शासकीय अधिक्षक श्री. द. चि. पाठकसाहेब यांनी आणि संस्थानच्या सर्व सेवकांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा व दोन मुली आहेत.

श्री साईबाबा त्यांच्या आत्म्यास शांति व सदगती देवोत.

# दयामयी श्री साईबाबा

—सौ. उर्मिला जोशी.
ॲड. चारी यांचा बंगला,
गोरे पेठ, नागपूर ४४००१०.

नेमकी कोणत्या क्षणी मी साईबाबांना भजू लागले हे मला सांगता येत नाही. पण जेव्हांपासून त्यांच्याबद्दल श्रद्धा वाटू लागली, तेव्हां पासून त्यांच्याबद्दल साहित्याचे वाचन मी मनःपूर्वक केले. त्यावरून असे वाटते की अजूनहि परमेश्वराचे अस्तित्व आहे. पण श्रद्धा मात्र पाहिजे. आपण संकट–काळी तर त्यांच्याकडे धाव घेतोच पण नित्यनेमाने जर आपण त्याचे चिन्तन केले तर आपले मन शांत व समाधानी राहू शकते. त्यांच्याबद्दलची श्रद्धा दृढ होण्यास मला खालील अनुभव कारणीभूत झाला.

जीवनमरणाच्या सीमारेषेवर एक देवाशिवाय व संताशिवाय आपणास कोणी तारू शकत नाही. त्यावेळी देवच आठवतो. माझी ही अशीच स्थिती झाली माझे युट्रस प्रोलॅप्स झाल्यामुळे डॉक्टरांनी मला मेजर ऑप–रेशन करावे लागेल असे सांगितले व मी मनातून घाबरूनच गेलें मला सतत मरणाचेच दृश्य दिसू लागले. आपण यातून वाचू किंवा नाही ह्या विचाराने मी त्रस्त झाले. अशाप्रकारची ऑपरेशन्स म्हणजे काहीच नाही, सायन्सच्या प्रगतीमुळे त्यात मुळीच धोका राहिला नाही. वगैरे गोष्टी सांगून सर्वांनी माझे भय दूर करण्याचा प्रयत्न केला. मी पण निर्धास्त झाल्यासारखे दाख–विले पण मनातून साईबाबांचा धावा सुरू केला. जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा साईबाबांचा जप सुरू झाला. मनःशांती साठी चमत्कारांनी भरलेल्या मासिकांचे पारायण झाले.

आदल्या दिवशी डॉक्टरांनी सांगितले की उद्या ऑपरेशन करावयाचे. मी पण न भिता साईबाबांवर भरवंसा ठेवून होईल तितका नामजप सुरू केला त्यादिवशी ऑपरेशन पूर्वीचे सर्व सोपस्कार झाले त्यावेळी मनोमन बाबांना प्रार्थना केली की ब्लडप्रेशर, हार्टबीट वगैरे सर्व नॉर्मल असू दे व कोणत्याहि प्रकारचा नैसर्गिक अडथळा न येता एकदाचे ऑपरेशन पार पडू दे कारण ऑपरेशन शिवाय दवाखान्यातून माझी सुटका नव्हती. दुसऱ्या दिवशी ब्लड डोनेटर ही वेळेवर आले त्यांचे सहकार्य, डॉक्टरांचे कौशल्य, पण त्याहि पेक्षा उच्चत्तम अशी साईबाबांची आशिर्वादाची शक्ती ह्यामुळे ऑपरेशन यशस्वीरित्या पार पडले. आज या गोष्टीला सात महिने झाले माझी तब्येत ठीक आहे. हा अनुभव लिहून घेणाऱ्या त्या दयामयी साईबाबास माझे शतशः प्रणाम !

❋ ❋

# शिर्डीत अवतरला साईनाथ

श्री. राजेंद्र शंकर कदम
गणेश भुवन, शेटचे चाळ,
सावरकर मार्ग रत्नागिरी.

० भारतामध्ये आतापर्यंत अनेक अवतार होऊन गेले. परंतु कोणत्याही अवताराने आपण अमुक एका देवाचा अवतार आहोत हे कधीच कोणाला स्वमुखाने सांगितलेले नाही. आपण कोण आहोत याची स्पष्ट कल्पना तर ते कधीच देत नाहीत. पण अप्रत्यक्षपणे सुद्धा तसा त्यांचा प्रयत्न दिसत नाही. देव अवतार घेतो, आपले कार्य करतो आणि देह ठेवतो.

इतर अवतारांप्रमाणेच शिरडीच्या साईबाबांनीही आपण कोण आहोत हे कधीच कोणास सांगितले नाही किंबहुना ते कळू न देण्याची खबरदारी घेतली. त्यामुळे त्यांच्याही बाबतीत ह्याच ठराविक मार्गाचा अवलंब करावा लागतो.

श्रीसाईबाबांनी शिर्डीत अवतार घेतला. आपले सारे जीवन लोककल्याणार्थ वेचून १९१८ मध्ये त्यांनी निर्वाण केले! त्यांच्या मंगल नामस्मरणाने आणि पूजनाने नुसती शिर्डीच नव्हे तर सारा भारत पुनीत होत असल्याचे विराट दृष्य आज आपल्याला दिसत आहे. शिर्डीला बाबांच्या दर्शनार्थ येणाऱ्या असंख्य यात्रिकात आणि भक्तात एक प्रकारची अनाकलनीय अशी एकात्मता आढळते. प्रदेश, वेष, भाषा, धर्म यांत वरवर दिसणारी विभिन्नता साईंच्या चरणी विलीन पावते, आणि आम्ही सारे भारतवर्षीय एक आहोत, आमचा आत्मा एक आहे. आमची हृदये एक आहेत असा साक्षात्कार इथे घडल्या–वाचून रहात नाही.

नगर जिल्ह्यातील कोपरगावापासून सात आठ मैल दूर असलेल्या शिरडी नावाच्या एका छोट्या खेड्यास आज एका महान क्षेत्राचे, यात्रा स्थानाचे महत्व आणि श्रेष्ठत्व लाभलेले आहे. भारतातील लक्षावधी साईभक्तांना शिर्डी हे "मायेचे माहेर" वाटू लागले आहे. १८५४ साली बाबा आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी औरंगाबादेहून शिर्डीस आले. मिसरूडही न फुटलेला एक बाल फकीर. पण समोरच्या माणसाने पहाता क्षणी नतमस्तक व्हावे असे

प्रेमार्द्र मुखमंडल आणि दयार्द्र दृष्टी एवढ्या वयात विश्वाला गवसणी घालणारी ही वृत्ती कुठून आली ? कोणी शिकविली ?

असे हे बाबा ज्या शिर्डीत आले ती होती तरी कशी ? तर अगदी मागासलेली आणि अस्वच्छ. पण बाबांना अशीच जागा हवी होती, की जिथे त्यांना पूर्ण एकांत मिळेल. बाबा खरे विदेही होते. कारण अन्न वस्त्र आणि निवारा या ज्या देहाच्या मुख्य गरजा त्या बाबांना मुळीच नव्हत्या. फाटके तुटके काही तरी वस्त्र पांघरून व यदृच्छया मिळेल ते खाऊन ते एका पडक्या मशिदीत रहात. मग ज्यामुळे लोक या फकिराभोवती जमू लागले असे कोणते आकर्षण त्यांच्याजवळ होते ?

आपल्या जीवनातील अवघड समस्या आणि सुखदुःखे बाबांच्यापुढे मुक्त कंठाने सांगावित म्हणजे आपल्याला संत्रस्त करणारे ऐहीक कोडे सुटते. एवढेच नव्हे तर जीवनातील अक्षुण्ण उदासिनता जाऊन मनाला नवचैतन्याची संजीवनी मिळते, जीवनाचे उस्फूर्त आणि उत्कर्षदायक असे क्षितीज दिसू लागते. यावर आमची नितांत श्रद्धा आहे, आणि म्हणूनच बाहुल्या नि खेळणी यात रमलेले मूल आई दिसताच "आई आई" करीत तिच्याकडे धाव घेते तद्वत या सप्तरंगी संसारात रमलेले आमचे मन बाबांची नुसती आठवण होताच "साई साई" करीत शिरडीकडे धाव घेऊ लागते.

बाबा आपल्या हयातीतच लोकांना उदी देऊ लागले होते. या उदीच्या अद्भूत प्रभावाच्या असंख्य कथा आहेत. आज बाबा देहाने आपल्यामध्ये नाहीत पण त्यांची उदी मात्र आहे. या उदीला मोठा अर्थ आहे. मनुष्याचा देह नश्वर आहे. तो नष्ट झाल्यानंतर उरते काय तर तीन चिमटया राख. म्हणून या उदीच्या रूपाने मीच तुमच्याजवळ आहे असे बाबा सूचवीत आहेत. पण उदीरूपी औषधाला मुख्य अनुपान आहे श्रद्धेचे .

श्रीसाईबाबांच्या शिकवणीत श्रद्धा आणि सबुरी या दोन गोष्टींचे महत्व अपरंपार आहे. श्रद्धा आणि सबुरी ह्या सख्या बहिणी आहेत असे बाबांनी सांगितले आहे, आणि दोघींचेही एकमेकावर जीव की प्राण प्रेम आहे. ज्यांनी या दोघींनाही आपलेसे केले त्याला या जगात कसलीही उणीव भासणार नाही. श्रीसाईबाबांचा या दोन सद्गुणांच्या बाबतीत फार कटाक्ष आहे. यासाठी

आज बाबांचे पुण्यस्मरण करीत असता त्यांनी परोपरीने महती गायिलेल्या श्रद्धा व सबुरी या दोन्ही सद्‌गुणांची कास आपण धरू या.

बाबांची पुण्यतिथी प्रतिवर्षी यते व जाते. दरवर्षी बाबांचा मार्ग चोखाळ–ण्यात आमचे पाऊल किती पुढे पडले हे आपण पाहिले पाहिजे. आम्ही त्या दृष्टीने स्वतःच्या आचरणावर बारीक नजर ठेवली पाहीजे. बाबांच्या ठायी भाव पाहिजे, श्रद्धा पाहिजे. अर्थात त्यांनी जे जे सांगितले ते ते आचरणात आणण्यासाठी आम्ही झटत राहिलो तरच बाबांचे पुण्यस्मरण केल्याचे फळ आपल्या पदरात पडणार आहे. नाहीपेक्षा पुण्यतिथी येईल आणि जाईल. आमच्यात काही एक बदल न होता आम्ही जेथे आहोत तेथेच राहू. पुण्यतिथी दिन हा आम्हाला जागे करण्यासाठी येत असतो. तुम्ही चार दिवस उत्सव करून मोकळे व्हावे यासाठी नाही. तेव्हा सांगायचे काय तर श्रद्धायुक्त अंतःकरणाने बाबांच्या शिकवणीचे आम्ही स्मरण करू या. ती आचरणात आणण्याची जास्तीत जास्त शिकस्त करू या.

## प्रकाशनाच्या मार्गावर

श्री साईलीलेच्या कवी लेखकांचा प्रातिनिधीक साईगीत संग्रह

**"साईगीत दरबार" भाग २ रा.**

शे-पाऊणशे साईकवीलेखकांना फोटो परिचय द्वारा प्रत्यक्ष भेटण्याची सुवर्णसंधी .............. मूल्य फक्त ६ रुपये M. O. ने खालील पत्त्यावर पाठवून आपली प्रत पोष्टाने घरपोच मिळवा.

पत्ता :— सौ. वर्षा हजारे, मा. व्यवस्थापिका, कृपाशू प्रकाशन, सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली (पूर्व) मुंबई–४०० ०६६.

# जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी........

–सौ. प्रतिमा प्रकाश उमचिगी.
१४/७२७. खेरनगर
बांद्रा (पूर्व) मुंबई–४०० ०५१.

० या वाक्याची प्रचिती आम्हांला १९८२ ला झाली ती अशी. माझी दोन नंबरची कन्या ६ वर्षाची, साधा ताप आल्याचे निमित्त झाले व तिच्या साठी संध्याकाळी औषध आणले. दुसऱ्या दिवशी गणेश चतुर्थी होती व घरात गणपती आणावयाचा असल्याने सर्वजण त्या सजावटीच्या गडबडीत होते. मी तिला औषध देण्यासाठी म्हणून बोलावले तर ती माझ्या हाकेला ओ देईना. मला वाटले तिला झोप लागली असेल. म्हणून मी तिला उठवायला गेले तर (तिचे नाव योगिता) ती कुठे होती. तिचे दोन्ही डोळे उघडे व काहीही हालचाल न करता अशीच पडून राहीली होती. आम्ही सर्वजण हाका मारतोय पण ती ना उठली कि जागी होऊन ओळखलं कोणाला. माझे यजमान पत्ते खेळत होते. ते व मी होतो त्या अवस्थेत तिला घेऊन डॉक्टरांकडे धावलो. त्यांनी आम्हांला लगेच चिठ्ठी दिली व सांगितले की हिला सांताक्रुजला आशा पारेख हॉस्पीटलला न्या. कारण तिचा ताप डोक्यावर चढला आहे. पण थोड्याच वेळात ते म्हणाले थांबा मी प्रयत्न करतो. मला ८ वा महिना लागला होता व माझी अवस्था इतकी केविलवाणी झाली होती की मी घाबरून मला रडूही येईनासे झाले. मी मनातून फक्त माझ्या परम पुज्य बाबांना आळवीत होते "बाबा आज तुमची भक्त इतक्या संकटात असताना तुम्ही कुठे आहात बाबा"? मी फक्त बाबा माझे साईबाबा माझ्या लेकराला वाचवा म्हणत होते. ही गोष्ट घडली तेव्हा रात्री आठ वाजले होते व तब्बल १ तास डॉक्टर व त्यांचा स्टाफ प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. एका तासाने ती शुद्धी–वर आली तेव्हा डॉक्टरांनी सांगितले की हिला औषध न दिल्याने फीट आली व त्यात ती निळी होत गेली. त्यादिवशी मी डॉक्टरांच्या पाया पडले व म्हटले आज तुम्हीच माझ्या मुलीला वाचविलेत. त्या दिवशी माझे परम पुज्य साई–बाबा डॉक्टरांच्या रूपाने धावून आले. त्यांनी जर प्रयत्न केला नसता तर

कदाचित रस्त्यात जाता जाताच माझी मुलगी गेली असती. पण साई भक्तावर बाबा असं कधीही संकट येऊ देत नाहीत. कदापी होऊ देणार नाहीत. त्या–नंतर मी माझ्या मुलीला तशीच घेऊन मागच्या कॉलनीत गांधीनगर मध्ये बाबांचे देऊळ आहे तेथे घेऊन गेलो व तिला बाबांच्या पायावर घातले व मी अक्षरश: माझ्या अश्रुंनी बाबांच्या पायांना स्नान घालून त्यांचे आभार मानले. बाबा आज तुम्हीं होतात म्हणून माझी मुलगी वाचली.

असाच दुसरा अनुभव. त्या दिवशी पासून कुठलेही काम बाबांचे नाव घेतल्याशिवाय करत नाही. मला पुण्याला जायचे होते तेही पहिल्यांदाच जाणार होतो. पण आरक्षण केले नव्हते तरीही बाबांचे नाव घेऊन निघालो व काय आश्चर्य! बाबांच्या कृपेने गाडीत सुंदर जागा मिळाली व येतानाही त्रास झाला नाही. मी मनात बाबांचे आभार मानीत होते व त्यांना कोटी कोटी प्रणाम करत होते. बाबा खरच तुम्ही जरी तुमचं शरीर सोडून गेलात तरी भक्तांच्या संकटास धावून जाता. अशा या लाडक्या साई माऊलीला माझे कोटी कोटी साष्टांग दंडवत प्रणाम !

## श्री साईबाबा संस्थान; शिरडी. जिल्हा अहमदनगर.

श्री. अरविंद नरहर ऊर्फ उत्तम कुलकर्णी (खडकीकर) तात्पुरते लिपीक; चौकशी कार्यालय यांना संस्थान सेवेतून काढून टाकण्यात आलेले आहे, तरी श्री साईबाबा संस्थानचे नावावर त्यांचेशी कोणताही व्यवहार करू नये, त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

# श्रीबाबांच्या विषयी एक प्रांजळ चिंतन

—श्री. शामराव जुवळे
जनार्दन भुवन छबिलदास रोड
दादर—२८

○ काळ अनंत आहे; जीवन क्षणभंगूर आहे. काळाच्या या ओघात अनेक संत आले व आपले अंगीकृत कार्य संपवून निघून गेले. संत श्रेष्ठ श्रीसाईबाबा यांनी मात्र काळाच्या ओघातच जगामध्ये पदार्पण केले पण विशेष म्हणजे काळाची गरज ओळखून त्यांनी ते केले. बाबांचे हे एक वैशिष्ट मानावे लागेल आणि या दृष्टीकोनातून विचार केला असता असेही मानावे लागेल की बाबा आपल्या संकल्पानुसार पृथ्वीतलावर अवतरले होते. केवळ योगायोगाने घडलेली अशी त्यांची कारकीर्द मुळीच नव्हती. त्यांचा संकल्प हा वज्र—संकल्प असल्या— मुळे संत श्री दासगणू महाराज कविवर्य दाभोळकर, देशप्रेमी दादासाहेब खापर्डे तसेच काकासाहेब दिक्षित, सर्वश्री नानासाहेब चांदोरकर, निमोणकर व तत्सम मंडळी तसेच श्रीमंत बुटी व इतर थोर मंडळी सर्व भाविक जनांचा बाबांनी आपल्या महान कार्यासाठी सदुपयोग करून घेतला होता. ही सर्व मंडळी व आज त्यांचे कार्य चालवीत असलेली भक्त मंडळी ही सर्व अर्जुना प्रमाणे निमित्तमात्र होती व आहेत असेच बाबांचे बाबतीत म्हणणे उचित ठरते. प्रत्येक घटना त्यांच्या संकल्पित योजनेनुसार घडत होती व आहे. अथपासून इतिपर्यंत सर्व कार्यामध्ये बाबा स्वतः असून नसल्याप्रमाणे वागत होते. कर्मामध्ये अकर्म व अकर्मामध्ये कर्म पहाण्याचे प्रात्यक्षिक बाबांनी स्वतः आचरून दाखविले. व्यक्ती म्हणून ते स्वतः वेगळे असे कधीच राहिले नव्हते. वैयक्तीकरित्या त्यांचा स्वार्थ कशामध्येच दिसून येत नव्हता. व्यक्ती— व्यक्तीमध्ये असणारी तेल्याची भिंत त्यांना मुळीच पसंत नव्हती. त्यांच्या नियोजित कार्यात कोणी बदल करू शकत नव्हता वा त्यात अडथळा आणू शकत नव्हता. त्यांनी आपले कार्य अव्याहतपणे चालू ठेवले होते व आजही ते तसेच चालू आहे. त्यांच्या कार्य पद्धतीवरून असे निश्चित आढळून येते की त्यांनी सर्वांचे कल्याण कदाचित् केले नसेल पण एखाद्याचेही अकल्याण केल्याचा दाखला

कोणासही दाखविता येणार नाही हे नक्कीच ! बाबांनी देहत्याग केल्याला आज ६६ वर्षे पूरी होत आलेली आहेत तरीही त्यांचे अस्तित्व प्रत्येक साई भक्तास हरघडी जाणवत आहे. हेच त्यांच्या अमर्याद शक्तीचे द्योतक आहे. आज त्यांचे भक्त सर्व जगभर पसरलेले आहेत व हीच त्यांच्या अलौकिक कार्याचा दाखला आहे.

श्रीसाईबाबांच्या वरील पार्श्वभूमिवर भक्त मनाला कोठेतरी खटकल्या-सारखे वाटते ते हे की त्यांच्या दरबारात निष्काम भक्तांची संख्या बरीच अपुरी वाटते. बाबांचे भक्त अगणित आहेत व त्यामुळे अशा भक्तांची संख्या वाढविण्याची हरतऱ्हेची मोहीम हाती घेतल्यास ती स्वागतार्ह ठरेल यात मुळीच संशय नाही. यादृष्टीने पहिले पाऊल उचलावयाचे झाल्यास प्रत्येक साई भक्ताने अंतर्मूख होऊन स्व-परिक्षण करणे उचित ठरेल. बाबांच्या शिकवणूकीनुसार आपली आध्यात्मिक प्रगती किती झालेली आहे हे अजमाविण्यासाठी स्वतःच स्वतःचे निरीक्षण करणे आवश्यक आहे आणि हे सर्व प्रांजळपणाने, प्रामाणिकपणाने तसेच विनम्रतेने केले पाहिजे. कालचक्र नियमितपणे चालू आहे. पण आजच्या भयानक जगात मानव-निर्मित दुष्टचक्र जोराने गती घेत आहे. या दुष्टचक्राचा विनाश करावयाचा झाल्यास निष्काम भक्तांची साई-पिढी निर्माण होणे फार अगत्याचे आहे व ती आजच्या काळाची प्रथम क्रमांकाची निकड आहे. हे सत्कार्य करण्याची सर्व साई भक्तांवर जबाबदारी येऊन पडलेली आहे. साई-भक्त ही जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडतील असा विश्वास आहे. असे झाल्यास साई-इतिहासात सोनेरी अक्षरांनी नमूद करण्यासारखी ती महान घटना ठरेल. अशी घटना लवकरच उदयास येवो हीच आपल्या सर्वांच्या आराध्य दैवत असलेल्या श्री साईबाबांच्या पवित्र चरणी विनम्रभावे प्रार्थना ! जय साई-राम.

(गेल्या अंकातील प्रेमाचा धावा हा संपादकीय मजकूर श्री. जुवळेकर यांचा होता.)

# ....तसबीर....

—श्री. ग. रा. पालकर.
बझारवॉर्ड कुर्ला मुं. ७०.

० बायजा त्या दिवशी बरीच खुशीत होती. फ्रॉक मधल्या दोनतीन-रूपयांची चिल्लर तिच्या पडणाऱ्या पाऊला-गणीक खुळ-खुळ वाजत होती. अन् त्याच्या तालावर तिचं बालमन थुई-थुई नाचत होतं. तिला खाऊ साठी इतके पैसे अद्याप कुणी दिले नव्हते; तिच्या मायनं देखिल. रोज शाळेत जाताना तिची माय पाच किंवा दहा पैशाच नाणं तिच्या हातावर टेवायची अन् खाऊला पैसे मिळाल्याच्या आनंदात बायजाच्या मनाची कळी खुलायची.

नऊ वर्षाची बायजा महानगर पालिकेच्या शाळेत तिसऱ्या इयत्तेत शिकत होती. बापाचं तिनं तोंड पाहिलं नव्हत. कारण तिच्या जन्माआधीच ते देवाघरी गेले होते. आजू-बाजूची तिच्या सारखी लहान मुलं "बाबा!" "बाबा!!" म्हणून स्वतःच्या वडीलांना जेव्हा मिठी मारायची खाऊ साठी हट्ट धरायची केव्हा तिचं बालमन तिळ-तिळ तुटायचं. आपणास बाबा का नाहीत? या प्रश्न चिन्हाच्या वेटोळ्यात तिचं मन गुरफटून जायचं. एकदा तिने मायला स्वतःच्या बापाबद्दलं विचारलं देखिल.

"मॉय! मना बाबा कुठे से ?"

"देवनाघर," निर्विकार चेहऱ्याने मायनं तिला सांगितलं,

"देवनाघर? कुठे से देवनाघर ? "बायजाने पिच्छा पुरवला.

"आकासमा" मायने तिची समजूत काढली.

बस्स्, रोज सकाळ संध्याकाळ आकाशाकडे पाहण्याचा बायजाचा कार्य-क्रम सुरू झाला केव्हा-केव्हा तिच्या बालमनात यायचं आपणच त्या आका-शातल्या देवाघरी जाऊन आपल्या बाबाला भेटावं, "बाबा! "बाबा!!" म्हणून हाक मारावी-मिठी घालावी.

मायला स्वतःच्या पती बद्दल कांहीही सुख-दुःख नव्हत. तो असून-नसून सारखाच होता. त्याच्या पाच वर्षाच्या संसारात त्याने मायला कधी सुखाचा घास खाऊ दिला नव्हता कि; आपुलकी-प्रेमाने कधी वागला नव्हता. माय दिवसभर राब-राब राबायची, आणि तो दारूच्या नशेत तर्र होऊन तिला मारझोड-शिवीगाळ करायचा. पुढेपुढे तो दारूच्या इतक्या आहारी गेला की दारू शिवाय त्याला कांहीहि सुचायच नाही. सकाळ झाली की उठल्या-उठल्या दारूची तल्हा लागायची त्याला. दुपारी कसातरी अर्ध शुद्धीत धडपडत यायचा, आणि रात्री ? रात्रीचं तर विचारायलाच नको, दारूच्या नशेने बेभान झालेल्या अवस्थेत तो मायला मार-झोड अन् शिवीगाळ करून हैदोस मांडायचा. बिचारी माय त्याच्या या जाचाला, पशुत्वाच्या वागणूकीला पुरती कंटाळली होती. पण दाद फिर्याद घेणारं असं माहेरचं कोणीच नव्हते. तिला दोन-तीन वेळा तिनं आत्महत्येचा विचारही केला. परंतु पोटात वाढणाऱ्या बिजांकूरामुळे तिच मन आत्महत्येला तयार झालं नाही आणि दारूच्या अतिसेवनान मात्र तिच्या पतीचा अंत झाला.

हजार-बाराशे लोक वस्तीच ते गाव दारू जुगार अन मटक्याच्या अड्यांच माहेर घर ओळखलं जात होतं. मायच बालपण इथेच गेलं. तिच्या तारूण्याला इथेच बहर आला. तिला सौभाग्याच लेण इथेच मिळालं. अन तिच्यावर वैधव्याच दुर्दैव इथेच कोसळलं. पतीच्या मृत्यूसमयी चार अश्रूही तिच्या डोळ्यात उभे राहिले नाहीत. जणू त्याच्या बरोबर केलेल्या संसारात रडून-रडून अश्रूचा झरा आटला असावा. अथवा रडण्याच त्राण त्या डोळयात राहिल नसाव; कुणास ठाऊक.

पतीच निधन अन् थोड्याच दिवसात मायची कुस उजवली. एका सुंदर गोंडस मुलीला तिनं जन्म दिला. तिचं नाव ठेवल बायजा. शेजाऱ्या-पाजाऱ्यांची सहानुभूती मायच्या पाठीशी होती. त्याच्या बळावर तो चिमुकल्या बायजाला घरात ठेवून चार-पाच घरी धुण्या-भांड्यांच काम करायची.

दिवस जात होते. बायजा शाळेत जाऊ लागली. पण स्वतःच्या बापाच तिला कधी विस्मरण झाल नाही की, आकाशाकडे पाहण्याचा तिचा छंदही सुटला नाही. माय कामाला गेली की; घरात एकटी असलेली बायजा स्वतःचे बाबा कसे होते या कल्पनेत रंगून जायची.

त्या दिवशी शाळेत जाताना दोन–तीन मिनीटापूर्वी त्याच रस्त्याने गेलेल्या एका प्रेतयात्रेतील प्रेतावर ओवाळलेले पैसे बायजाला रस्त्यावर पडलेले दिसले. तिने ते गोळा केले व आपल्या फ्रॅक मधल्या खिशात घातले. पंधरा वीस पावलं पुढे गेल्यावर पुन्हा तिला तशाच प्रकारचे पैसे मिळाले. बायजा खुष झाली. इतके पैसे तिला तिच्या मायने कधीच दिले नव्हते. ती चालताना होणारा पैशाचा खुळ–खुळ आवाज तिच्या बाल मानला सुखवित होता. मधल्या सुटीत खूप– खूप खाऊ खायचा या विचारातच तिने वर्गात पाऊल टाकलं. बाकावर बसता–बसता तिच्या लक्षात आलं. आज कुसुमचा वाढ दिवस. कालच तिनें बायजाला मधल्या सुटीत आपल्या घरी बोलावलं होतं अन् शाळेजवळ रहाणाऱ्या कुसुमच्या घरी बायजा गेली.

"आई ! ही माझी वर्गमैत्रिण बायजा, " कुसुमने बायजाची आपल्या आईशी ओळख करून दिली.

"बैस हं! "कुसुमच्या आईने तिला बसायला सांगून स्वत: फराळाचं आणायला आत गेली.

बसल्या–बसल्या बायजाची नजर सभोवार फिरू लागली. बैठकीची खोली उंची फर्निचर अन् अद्यावत साधनांनी सजली होती. कुसुम एका–एका वस्तुची आई–वडिलांकडून ऐकलेली नांवे बायजाला सांगू लागली.

कित्ती .......कित्ती छान आहे नाही कुसुमचं घरं.!!

बायजा मनातल्या मनात म्हणत त्या वस्तुचं सौन्दर्य टिपू लागली.

"कुसुम ! हे कुणाच ग चित्र?" बायजाने साईबाबांच्या तसबीरीकडे बोट दाखवित तिला विचारलं.

"साईबाबांचं,"कुसुमने तिला सांगितलं.

"साईबाबांच ?" बायजाला कांही अर्थबोध झाला नाही तिने पुन्हा विचारलं.

"साई"बाबा," म्हणजे कुणाचे ग हे बाबा ?

"सर्वांचे बाबा," इति कुसुम.

"सर्वांचे बाबा? माझे देखिल बाबा?" बायजाने मनातला भाबडा प्रश्न केला.

"हो! हो!! तुझे देखिल बाबा माझे आई–वडील सांगतात, साईबाबा किनई सर्वांचे बाबा आहेत."

"बाबा" नावाच्या शब्दाला तहानलेलं बायजाचं व्याकुळ बालमन क्षण–भर शांत झालं. कुसुमच्या घरुन परतते वेळी आपणही या बाबांना आपल्या घरी आणावं असं तिला वाटू लागलं. शाळेजवळ असलेल्या तसबीरीच्या दुका–नात तिने साईबाबांच्या अनेक छोट्या–मोठ्या तसबीरी पाहिल्या होत्या. टॅक्सी रिक्षा–मोटार–दुकानाचे फलक यावरहि तिने साईबाबांचं चित्र पाहिलं होतं. पण हे सर्वांचे बाबा असू शकतील असं तिला वाटलं नाही. परंतु कुसुमच्या माहितीमुळे तिला ते आता खूप–खूप जवळचे वाटू लागले. आकाशातल्या देवाघरी असलेल्या आपल्या बाबा सारखे.

शाळेच्या फाटका जवळ निर–निराळ्या प्रकारच्या खाद्य पदार्थांची विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांना गराडा घालून बरीच मुले–मुली उभी होती. पण बायजा तिकडे वळली नाही. मनात उठणारी खाऊची तीव्र इच्छा मारून ती फाटकातून सरळ आपल्या वर्गाकडे गेली. नेहमी सारखं शिक्षकांच्या शिकवणीकडे तिचं लक्ष लागेना. घरी जायच्या सुट्टीची ती वाट पाहू लागली. कारण साईबाबांची तसबीर विकत घ्यायला ती अधिर झाली होती.

# माझा जो जाहला काया-वाचा मनी-

-श्री. उदय सीताराम राऊत.
मुक्काम-पोष्ट- खंडाळे,
तालुका अलिबाग
जिल्हा रायगड
पिन-४०२,२०१

० माझी बँकिंग सर्व्हिस रिक्रुटमेंट बोर्डाची परिक्षा दि. ६ जून १९८२ ला पनवेलला झाली होती. परिक्षा नंबर होता पीएल-१७००६८. त्यानंतर मी ह्या परिक्षेत श्रीसाईकृपेने उत्तिर्ण झालो व तशा अर्थाचे बँकेचे पत्र मला ऑक्टोबर ८२च्या दरम्यान मिळाले. त्यानुसार मुलाखतीसाठी दि. ११-११-१९८२ ला बँक ऑफ इंडिया, झोनल ऑफिस, महाराष्ट्र झोन, तिसरा मजला, ५१२न्यू सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे-४११,०३०, ह्या पत्यावर बोलाविले. नंतर मी व माझा मित्र श्री. मधुकर पाटील ह्यांना येऊन दि. १०-११-८२ला सिंहगड एक्सप्रेस ह्या गाडीला बसलो व अर्थातच् सुखरूप पोहचलो. नंतर दुसऱ्या दिवशी ४ वाजता मुलाखत म्हणून बाबांचा धावा करीत राहिलो. त्याप्रमाणे श्रीसाईबाबा धावत येऊन माझ्या जिभेवरच बसले. मुलाखत घेण्यासाठी बोर्डाचे ६ सभासद होते. त्या ६ जणांना मी (अप्रत्यक्षपणे) उत्तरे देऊन खूष केले. (येथे अप्रत्यक्षपणे म्हणण्याचे कारण म्हणजे ही सारी उत्तरे श्रीसाईबाबाच देत होते) व त्याचे फळ मिळाले हे वेगळे सांगावयास नको मी तीही परिक्षा उत्तिर्ण झालो.

परंतु खरी मजा पुढेच आहे. इकडे आमच्या घरी, खंडाळ्याला माझ्या आजीला बाबांनी दृष्टांत देऊन माझ्या यशाबद्दल शिक्कामोर्तब केले. दि. १०-११-८२ च्या रात्री आजीला एक स्वप्न पडले. त्यामध्ये बाबा मयुर रथात बसून चालले आहेत. तेव्हा आजी म्हणते, बाबा नमस्कार; आजी बाबांना थांबावयास सांगते, परंतु बाबा म्हणतात "मला आता थांबावयास वेळ नाही. मला पुण्याला अत्यंत तातडीचे काम आहे. तेव्हा आता गेलेच पाहिजे. हे स्वप्न सकाळी पडले व सकाळी पडलेली स्वप्ने खरी होतात.

त्याप्रमाणे आजी फारच खुष झाली व ती समजली की आपल्या नातवाला आता काहिच भीती नाही. बाबांचा वरदहस्त असल्यावर आता कितीही संकटे येवोत त्याला कालसमयी भीती नाही.

नंतर मी पुण्याहून दुसऱ्यादिवशी आलो. घरातले एकंदर वातावरण प्रसन्न व आनंददायक वाटत होते. तेव्हा मी सुद्धा खुष झालो. कारण मला मुलाखत चांगली गेली होती ना म्हणून तर मी खुषीने कारण विचारण्या–च्याच अगोदर त्यांनी मला यश चिंतविले. तुला मुलाखत चांगली गेली असणारच असे आजीने म्हटल्यावर मी विचारले हे तुम्हांला कसे कळले ? तेव्हा त्यांनी वरील दृष्टांत कथन केला, व नकळत डोळयातून अश्रू घरंगळत बाहेर पडले.

काय ही साईची सर्वव्यापकता म्हणून नकळत वरील उक्ती बाहेर पडली.

।। माझा जो जाहला काया–वाचा मनी ।।
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ।।

अशा या भक्तसंकटी पडता धावून येणाऱ्या व सर्व जगाचा उद्धार कर–णाऱ्या, शिरडीनाथांच्या चरणी माझे व माझ्या कुटुंबियांचे अनंत प्रणाम.

***卐*******

**असं घडलं**
**श्रीबाबा शिरडीत असताना**

# बाबांनी दान दिले पण नशीब आडवं आल

१९८२ साल, बरीच मंडळी होती. द्वारकामाईत प्रसादाची हंडी कर–ण्याचे काम चालू होते. हंडीत टाकण्यासाठी आणलेल्या मटणाचे तुकडे काही मंडळी करीत होती. शिरडीजवळील खेडयातला एक ब्राम्हण बाबांच्या दर्शनास आला. दर्शन घेऊन तो परत निघाला असता बाबा द्वारकामाईतून सभा मंडपात आले व मटण कापणाऱ्या मंडळीस म्हणाले, "अरे, त्यातले या ब्राम्हणास द्या. त्याची मुलेबाळे खातील."

त्याकाळी कर्मठपणा किती! सोवळं ओवळे कडक ब्राम्हण व मटण यांची गाठ पडायची नाही. ब्राम्हणाला मटणाचे दान! अब्रह्मण्यं. ब्राम्हणही भयभीत झाला. पण बाबांपुढे बोलणार कोण? असलं दान घ्यावे तर महा पाप लागेल न दिलं तर बाबांचा क्रोध ओढवेल अशा अडकित्यात मंडळी सापडली. म्हणून कोणी तयार होईना बाबा रागाने म्हणाले 'अरे मी काय सांगतोय? त्यांतलं थोडसं या ब्राम्हणाला द्या" शेवटी एकाने चार तुकडे ब्राम्हणाच्या उपरण्यात टाकले. ब्राम्हण खाली मान घालून निघून गेला.

शिरडी पासून मैल दीड मैल गेल्यावर त्याला एक ओढा लागला. पाणी पाहून त्याचा मनात विचार आला. तो जवळच्या शेतात गेला व न पहाता उपरणे झटकून ते सर्व तुकडे टाकून दिले व ओढयावर जाऊन उपरणे धुवू लागला. त्याच्या हाताला काही कठीण लागले. त्याला वाटले असेल एखाद हडूक चिकटून राहिलेले असेल हात घालून त्याने ते बाहेर काढले. पहातो तो सुमारे तोळाभर सोन्याची कांडी चकचक चकाकणारी. तो स्तिमीत झाला. बाबांचे अतर्क्य सामर्थ्य व आपला करंटेपणा यांची एकाच वेळी त्याला प्रचिती आली. आता लोभ मागे लागला. सोन्यामुळे अब्रम्हण्यं गेले. टाकलेले तुकडे परत आणण्यासाठी तो शेताकडे धावत गेला. पण तेथे काहीच नव्हते. त्याला रडू कोसळलं बाबा काही करतील या आशेने तो धावत धावत द्वारका माईत आला. पण बाबा तिथे नव्हते मंडळींना सर्व हकीकत सांगून त्याने सोन्याची कांडी दाखवली. सर्वांना आश्चर्य वाटले. इतक्यात बाबा आले. ब्राम्हणाला पहाताच बाबांना क्रोध आला व सटका हाती घेऊन त्यांनी त्याला हाकून लावले. तो गेल्यावर बाबा शांत झाले व मंडळीस म्हणाले, "ब्राम्हण दुर्भागी त्याच्या मुलांच्या नशिबी होते पण याचं नशीब आडवं आलं."

(साईलीला त्रैमासिक जाने–फेब्रु–मार्च १९५७ वरून)

# जया मनी जैसा भाव

० रामनवमी उत्सवाचा दिवस. बाबांच्या दर्शनासाठी गर्दी उसळली होती. यावर्षी ६०–६५ हजार यात्रा जमली होती. बाबा सकाळ पासून बसले होते. ते ११ वाजले तरी उठले नाहीत. गर्दीचे नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्यांना भक्तांनी विनंती केली की थोडा वेळ यात्रा थांबवा व देवाला न्याहरी करु द्या पण बाबा म्हणाले, "नको, मला भूक नाही," असह्य ऊन, घामाच्या धारा, गर्दीची रेटारेटी जीव नकोसा करुन टाकणाऱ्या गोष्टी. अशा या गर्दीत मशिदीच्या बाहेर कडक उन्हात एक ७५ वर्षांची कृश व थकलेली म्हातारी देवाच्या दर्शनासाठी तळमळत उभी होती. तिला पुढे जायला वाव तरी कसा मिळणार ? 'अरे, या गरिब म्हातारीवर दया करा. बाबा ! तुझे दर्शन होऊ दे,' अशी सारखी ओरडत होती. त्या जनसागराच्या लाटां–पुढे (जय जयकार) तिचे कोणाला ऐकू येणार ? पण बाबांनी ऐकले होते. अशा वेळी शामा देवाच्या दर्शनासाठी गर्दीतून वाट काढीत चालले होते. म्हातारीकडे त्याचे लक्ष गेले व त्यांना तिची दया आली. ते म्हणाले 'चल आई. मी तुला देवाचे दर्शन घडवितो " हे ऐकून त्या म्हातारीच्या चेहऱ्या–वर जो काय म्हणून आनंद चमकला तो शब्दांकीत करणं अशक्य. शामाने तिला देवा जवळ नेली. बाबांना पहाताच 'देवा' अशी मोठी आरोळी ठोकून तिने बाबांच्या कमरेला घट्ट मिठी मारली व तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. बाबांनी तिचा माथा व पाठ कुरवाळून तिच्या घरच्या बारीक सारीक गोष्टींची चौकशी केली. बाबा म्हणाले, "आये, मी कवापासून तुझी वाट बघतु ग, आये, मला खायला काय आणलस ग." म्हातारी म्हणाली, "देवा, मी एक भाकर व दोन कांदे आणले. वाटेत थकल्यामुळे ओढ्यापाशी अर्धी भाकर व एक कांदा म्यँ खाल्ला अर्धी भाकर व एक कांदा आहे. तो तूं खा. देवा," म्हातारीनं पदरात बांधून ठेवलेली भाकर व कांदा देवाच्या हातावर ठेवला देवानं ते पदार्थ तिथल्या तिथे खाल्ले आणि म्हटले, "आये, तुझी भाकर मला लई गोड लागली ग.!"

(सा. ली. अंक ४–५–६ शामा कथीत)

# नानांची पुरण पोळी

० एकदा नानासाहेब चांदोरकर एकटेच बाबांच्या दर्शनास आले. दुपारच्या बाराचा सुमार होता. बाबांचे चरण वंदून नाना बसले नाहीत तोच बाबा म्हणाले, "नाना आज पुरण पोळी खावीशी वाटते तर पुरणपोळी करुन आण." नाना म्हणाले, "बाबा, मी एकटाच आहे. घरची मंडळी बरोबर नाहीत, यावेळी स्वयपाक करण्यास बाई मिळणे कठीण, आता उशीर झाला आहे. उद्या आणीन. "बाबा म्हणाले, "आजच आणं. उशीर झाला तरी चालेल." नानांनी पुष्कळ समजाविले. पण बाबा आपला हट्ट सोडिनात. शेवटी नाना गावात गेले. मोठ्या मुष्कीलनं बाई मिळाली. सर्व सामग्री गोळा केली व दुपारी चार वाजता पुरण पोळीचा नैवेद्य बाबांना अर्पण केला. बाबा म्हणाले, "छान केलेस नाना, आता हे ताट घेऊन तू जा." नानांना वाईट वाटले. ते म्हणाले, "बाबा, तुम्हांला पुरणपोळी खायची नव्हती तर मग मला एवढा खटाटोप करावयास कशाला लावलेत? तुम्ही ताटाला स्पर्शही केला नाही. थोडी तरी ध्या म्हणजे माझे समाधान होईल." बाबा म्हणाले, "नाना १८ वर्षे माझ्या संगतीत राहून तू अजून कोरडाच का? माझी पारख अशीच का केलीस ? अरे! बाबा म्हणजे हा औट हाताचा देह जो दिसतो तेवढाच का आहे.? मी मुंगी माशी वाटेल ते रूप धारण करून खातो. तुझी पुरण पोळी मी माशीच्या रूपानं तेव्हाच खाल्ली आहे. आता ताट घेऊन जा व तू आनंदाने जेवण कर." परंतु नानांची समजूत पटेना. अखेरीस माश्यामुंग्या वगैरेमध्ये आपणांस कसे ओळखावे याची सांकेतीक खूण बाबांनी नानांना सांगितली तेव्हा त्यांचे समाधान झाले.

(सा. ली. व. १ अंक ५ वरून)

टीप — पुढे ही पुरणपोळीची हकिकत नानासाहेबांनी श्री. देव मामलेदार (बाबांचे बाळ) यांना सांगितली त्यावर बाबांनी कोणती खूण सांगितली अशी पृच्छा श्री. देवांनी केली. नाना म्हणाले सांगेन केव्हातरी. नंतर आज उद्यां करता करता चांदोरकर साईचरणी विलीन झाले व हे गुह्यज्ञान अजूनही गुह्यच राहिले आहे.

—संग्राहक साईनंद

# भाजणी व भिकारीण

**********************

० श्री. नानासाहेब चांदोरकर बाबांच्या दर्शनास शिर्डीस गेले होते ते बसले नाहीत तोच बाबा म्हणाले, "नाना, मी आज तुला एक धडा देतो तो नीट गिरव," "चांदोरकर म्हणाले, उत्तम मी न विसरता तो गिरवीन," बाबा म्हणाले, "कोणी भिकारी आपल्या दारी आला तर आपल्या इच्छेनुरूप व ताकदी प्रमाणे जे त्याला द्यावयाचे ते त्याला द्यावे. नसेल द्यायचे तर गोड शब्दात नाही म्हणून सांगावे. बरं आपण दिल्यास तो आणखी मागू लागला तर नम्र शब्दात नकार द्यावा. आपल्या पैशाचा वा अधिकाराचा तोरा दाखवू नये. उद्धट वा कटू शब्द बोलू नयेत." नाना म्हणाले, बाबा हा धडा सोपा आहे. मी तो विसरणार नाही."

पुढे बरेच दिवसा नंतर नाना दर्शनास आले. नेहमीची रीत अशी की नाना आले की बाबा विचारीत काय नाना कसं काय? ठीक आहे ना? पण या खेपेस मात्र चांदोरकर चरण सेवेत बसले तरी बाबा काही बोलले नाहीत की त्यांच्या कडे ढुंकूनही पाहिले नाही. इतरांशी बोलत राहिले. बराच वेळ नानांनी धीर धरला पण बाबा बोलेनात. नानांना हुरहूर लागली बाबा असे आज कां रागावले? शेवटी धीर धरून नानांनी विचारले, 'बाबा आज बोलत का नाही माझ्याशी? रागावलात का या लेकरावर?" बाबा म्हणाले, "जो आपला धडा गिरवित नाही त्याच्याशी आपण कां बोलावं? "नाना म्हणाले, "बाबा मी सर्व धडे मनापासून गिरवतो. काही विसरत नाही." बाबा म्हणाले " कल्याणला कोणी भिकारीण आली होती कां? आईनं (नानांची पत्नी) भाजणी केली ती ती मागत होती कां? "प्रथम नानांच्या काहीच ध्यानात येईना. विचारांती त्यांना एकदम आठवले.

एके दिवशी माईसाहेबानी (नानांची पत्नी) डेराभर भाजणी तयार केली. एक दोन दिवसानंतर एक भिकारीण आली व भिक्षा मागू लागली. नोकरान भिक्षा आणली पण तिला ती भिक्षा नको होती. मला भाजणी द्या म्हणून सांगू लागली. नोकराने माईसाहेबास सांगितले. त्यांनी नोकराबरोबर थोडी भाजणी पाठवून दिली. ती पाहून ती म्हणाली मला एवढीशी नको. आणखी भाजणी पाहिजे नोकराने आणखी भाजणी आणली तरी तिला आणखी भाजणी

पाहिजे होती. थोडी घेईना तेव्हा माईसाहेब बाहेर आल्यावर म्हणाल्या, "अग तुला इतकी भाजणी दिली तरी तू आणखी काय मागतेस ?" भिकारीण म्हणाली मला सगळी भाजणी पाहिजे. माईसाहेब म्हणाल्या 'अग तुला सगळी दिली तर मग मुलांबाळांना काय देऊ? पाहिजे तर अर्धी भाजणी देते ती घे व समाधान मान," भिकारीण ऐकेना. संबंध भाजणी साठी हट्ट धरून बसली. काही घेईना व तेथून हलेना. नाना साहेब वर दिवाणखान्यात होते माईंनी त्यांना खाली बोलाविले, व सर्व हकिकत सांगितली. नाना भिकारीणीस म्हणाले, "काय गं ए. तुला अर्धी भाजणी देऊ केली तरी तुला नकोशी झाली ? लाज नाही वाटत तुला संबंध भाजणी मागायला? तुम्ही भिकारी फार मग्रूर झाला आहात. देतो ते घे व चालती हो येथून" पण ती हलेना. नानांना राग आला व म्हणाले , "तुला काय सांगितले ? चालती हो, तुला काही मिळणार नाही" व शिपायास म्हणाले "हिला धक्के मारून हाकलून लावा." भिकारीण म्हणाली 'धक्के कशाला ? माझं काम झालं. मी आपली येथून जाते कशी भिकारीण गेली. हे सर्व आटपल्यावर नानांनी बाबांचे पाय धरले व म्हणाले, "क्षमा करा, मी धडा गिरविण्यात चुकलो."

बाबा म्हणाले, "एवढेच मिळेल असं गोड शब्दात सांगायचं व स्वस्थ बसायचं. सबुरी धरली असतीस तर ती भिकारीण थोडा वेळ थांबती व निघून जाती पण तसं न करता अधिकाराचा तोरा दाखवून तिला हाकलून देत होतास. अरे, अजूनही तुझ्या लक्षात आले नाही का की मीच भिकारणीच्या रूपाने आलो होतो. भाजणीची खूण तुझ्या लक्षात कशी आली नाही ?" भक्तांना दिलेला धडा ते आपल्या आचारणात आणतात की नाही याची परिक्षा करण्याची बाबांची ही विलक्षण पद्धत पाहून नानांना आश्चर्य वाटले.

(भिकारी नेहमीच सतावतात हा आपला अनुभव आहे इच्छा असेल तर द्यावे नसेल तर नाही म्हणावे. आपण बोलू लागलो तर भिकारी अधिक बोलू लागतात. आपण गप्प बसलो तर ते थोडा वेळ वाट पाहून निघून जातात. कारण पुष्कळ घरी फिरावयाचे असते. म्हणून ते आपला 'अमूल्य' वेळ व्यर्थ दवडू शकत नाहीत. हे लक्षात घेतले तर बाबांच्या उपदेशातील 'सबुरी' चांगली ध्यानात येईल.)

सा. ली व १ अंक ५.

# मांगाला दिलेले दान बाबांना मिळाले

० नानासाहेब चांदोरकर शिर्डीस असता सूर्यग्रहणाची पर्वणी आली. तेव्हा गोदावरीत स्नान करावे अशी त्यांना इच्छा झाली. बाबांनी परवानगी दिल्यावर नाना कोपरगावास गेले. नाना नदीत उतरून स्नान करीत असता एक मांग 'दे दान सुटे गिराण पुकारीत तेथे आला. पर्वकाली केलेल्या दानाचे पुण्य विषेश असत. नानांनी त्याला दोन पावल्या (आठ आणे) दिले. त्याच वेळी इकडे मशिदीत आनंदराम मारवाडी दर्शनास आला होता. त्याला बाबा म्हणाले, "या पहा दोन पावल्या. त्या मलानानांनी दिल्या" असं म्हणून बाबांनी त्या पावल्या खिशात ठेवल्या.

(बाबा सर्व व्यापीत कसे आहेत व गरीबांची सेवा म्हणजे बाबांचीच सेवा आहे हे यावरुन दिसून येते.)

सा. ली. व २ अंक २.

# या आजीबाई

० बाबा नानासाहेबांच्या पत्नीला माईसाहेब आई म्हणून हाक मारीत असत. एकदा माईसाहेब दर्शनास आल्या असता नेहमी प्रमाणे आई न म्हणता 'या आजीबाई' असं म्हणाले. बाबा असं कां म्हणाले हे माईना कळले नाही. घरी आल्यावर त्यांनी नानासाहेबांना विचारले कीं, बाबा मला आजीबाई कां म्हणाले ? नाना म्हणाले, अग, माणसाकडे पाहिल्यावर बाबांना भूत भविष्य सगळं कळते आपली द्वारकी प्रसूत होण्याची वेळ झाली आहे. कदाचित ती एव्हांना बाळंत झाली असेल. "दुसऱ्या दिवशी द्वारकाताई सुखरूप बाळंत झाल्याचे पत्र आले. बाबा बोलले त्याच वेळी आईची आजी झाली होती.!!

(सा. ली. वर्ष २ अंक २)

# दाता साई, त्राता साई, सर्व दुःखहर्ता साई

—सौ. अन्नपूर्णा म. पवार
२२।८६२, डी. एन. नगर
अंधेरी (प) मुंबई ४०० ०५८

० शिरडी क्षेत्रनिवासी सच्चिदानंद सदगुरू साईबाबांचे नाव आज सर्वज्ञात झालेले आहे. साईबाबांचे भक्त आज जगात चोहीकडे पसरलेले आहेत. यातील काही काही भक्तांना तर माझ्याप्रमाणेच पहिल्या शिरडी भेटीपूर्वी साईबाबांविषयी काहीच माहिती नव्हती. तरी देखील श्री साईबाबा अशा भक्तांना साई सच्चरितात म्हटल्याप्रमाणे चिमणीचे पोर जसे पायाला दोरा बांधून ओढत आणावे त्याप्रमाणे कळत नकळत शिरडीची वारी घडवितात आणि आपल्या पायी ठाव देतात. अशा श्री साईबाबांचा मला आलेला पहिला अनुभव मी खाली देत आहे.

सन १९७५ सालची गोष्ट. आमच्या शेजारी रहाणारे एक साईभक्त श्री. महाडीक हे मला म्हणाले "आई, तुम्ही शिरडीला चला. माझ्याकडे एक जादा तिकीट आहे." वास्तविक तोपर्यंत मला साईबाबांविषयी कोणतीही माहिती नव्हती. परंतु का कोण जाणे मी शिरडीला जाण्यास तयार झाले.

गुरुवारी सायंकाळी आम्ही शिरडीस पोहोचलो. थोड्या वेळानंतर मुक्कामावरील खोलीत सामान ठेवून व हातपाय धुवून आम्ही साई मंदिरात दर्शनाला गेलो. आत मंदिरात गेल्यावर त्या सुंदर साई मूर्तीचे दर्शन घडताच माझे मन श्रद्धेने भरून आले. त्या मुर्तीकडे बघताच असे वाटू लागले की जणू काही ह्या मुर्तीचे आणि आपले काही जुने ऋणानुबंध आहेत. न कळत माझे भाविक मन त्या सुंदर साईमूर्तीला एक नवस बोलून गेले की, "बाबा! माझ्या मुलाचे लग्न तुम्हीच घडवून आणा, मी त्या उभयता जोडप्यासह तुमच्या भेटीस येईन."

ते शिरडीतील दोन दिवस कसे आनंदात निघून गेले तेच मला समजले नाही. माझे मन पूर्णपणे साईमय झालेले होते. पुढे आम्ही मुंबईला आलो.

यथावकाश माझ्या मुलाचे लग्नही जमले. नंतर साईकृपेने त्याला तीन मुलेही झाली. परंतु मी मात्र श्री साईबाबांना बोलल्ेला नवस पार विसरून गेले होते.

पुढे एके दिवशी बुधवारी माझी मोठी नात अचानक मला म्हणू लागली की, "आजी ! आपण शिरडीला साईबाबांना भेटायला जाऊ या." लहान मुलांचे बोलणे म्हणून मी काही लक्ष दिले नाही पण पुढच्याच बुधवारपासून अचानक माझ्या नातीचा कान दुखू लागला. अनेक डॉक्टरांना स्पेशालिस्टना दाखवून आले पण काही फरक पडेना. उलट तो कान दिवसें दिवस जास्तीच दुखू लागला. त्यातून घाणेरडे पाणी येऊ लागले. आम्ही सर्वजण हैराण होऊन गेलेलो होतो. काही मार्ग सापडावा म्हणून देवाजवळ प्रार्थना करीत होतो.

त्या काळातच एके दिवशी माझ्या अंगात देवीचा संचार झालेला असता माझ्या मुलाने आपल्या मुलीच्या कानासंबंधाने माहिती विचारली. त्यावर देवीने शिरडीच्या साईबाबांचा नवस राहिलेला असल्यामुळे कान दुखत असल्याचे सांगितले. तावडतोब संध्याकाळी मी एक नारळ देव्हाऱ्यात ठेवत साईबाबांना मनोमन विनविले की, बाबा ! माझ्या हातून चूक झाली त्याबद्दल मला क्षमा करा. माझ्या नातीचा कान बरा होताच मी मुला सुनांना नातवंडासह तुमचा नवस पुरा करण्यासाठी नक्की येईन."

आणि काय चमत्कार ! दुसरे दिवशी सकाळी माझी नात झोपेतून उठली ती हसत खेळतच. तिचा दुखरा कान साफ बरा झालेला होता आणि तोही अवघ्या एका दिवसताच. साईलीला अगाध आहे हेच खरे.

खरोखरच साईबाबांनी माझ्या विसराळू मनाला आपला चमत्कार दाखविलेला होता. साईसच्चरितात वर्णिल्याप्रमाणे श्री साईनीं माझ्या राहिलेल्या ऋणाची मला आठवण करून देऊन त्याची माझ्याकडून फेड करून घेतली होती. श्री साईबाबांना आपल्या भक्तांची किती ही काळजी ? अशा या भक्तवत्सल साईबाबांस माझे कोटी कोटी प्रणाम.

✦✦✦✦✦✦

# भक्ती तेथे शक्ती

—सौ. उषा प्र. अधिकारी,
सावित्री सदन, बंदर रोड,
मु. पो. रत्नागिरी.

० श्री बाबांच्या अनेक भक्त स्त्रिया होत्या. जिची जशी भक्ती असेल त्याप्रमाणे त्याचे फळ तिला मिळे. नारायण कृष्ण पेणसे नावाचे एक गृहस्थ होते. त्यांच्या पत्नीचे नांव 'माई' असे होते. ही स्त्री अत्यंत सात्विक व भाविक होती. श्रीबाबांविषयी अनेक गोष्टी तिच्या कानावर येत. श्रीसाईबाबा हे महामहंत असून प्रत्यक्ष परमेश्वरी अवतार असून दर्शन घेण्यास अगदी योग्य आहेत, हे तिला समजताच त्यांचे दर्शन आपणाला कसे होईल हाच एक विचार तिला सतावू लागला. अगदी राहवेना तेव्हा तिने आपल्या पतीला आपली इच्छा बोलून दाखविली. माई जेवढ्या भाविक होत्या तेवढे पेणसे नव्हते ते म्हणाले, अगं वेडे, तिथे एक वेडापिसा मुसलमान राहातो. तो ढोंगी आहे. शिरडीच्या लोकांनी उगीच त्याचे स्तोम माजवून त्याला परमेश्वर करुन टाकले आहे. जो परमेश्वर आहे तो शिळपाके तुकडे मागून पोट भरील का? उगाच अशा माणसाचे लोकांनी देव्हारे माजवले आहेत आणि तू पण त्यात सामील होऊन दर्शनाचा खुळा हट्ट घेऊन बसली आहेस." विचारी माई ! नवऱ्याचे बोल ऐकून खूप रडली आणि खिन्न मनाने घरात वावरू लागली. आपण कठोर बोलून पत्नीचे मन दुखवले याबद्दल पेणशांना काहीच वाटले नाही. पण शिरडीच्या परमेश्वराला आपल्या या लेकराची दया आली. तिची इच्छा पूर्ण करायची नाही तर आपण कशाला ? असेही त्यांचे मनात आले. श्रीबाबांची इच्छा झाल्यावर कशा गोष्टी घडतील ते काय सांगायला हवे ? पेणसे सरकारी अंमलदार असल्याने त्यांचे काम निघाले ते नेमके शिरडीतच. सरकारी काम! गेलेच पाहिजे!! पण गेलो तरी मी काही दर्शन वगैरे घेणार नाही असा त्यांचा ठाम निश्चय होता. मात्र के पत्नीला म्हणाले, "अग, मी सरकारी कामासाठी शिरडीस जातोय. तुला त्या ढोंग्याचे दर्शन घ्यायचेय ना? चल माझ्या बरोबर. मात्र माझ्या कामात काही व्यत्यय आणू नकोस." पतीचे हे बोलणे कानावर पडले मात्र माई लहान मुला-सारख्या नाचू लागल्या. त्यांनी प्रवासाची तयारी केली. श्रीबाबांची पूजा

करण्यासाठी आवश्यक ते साहित्य घेतले. दोघे शिरडीत आले. पेणसे कामावर निघून जाताच माई तडक द्वारकामाईत गेल्या. श्रीबाबांचे मनोहारी दर्शन होताच त्यांचे सर्वांग आनंदाने मोहरून गेले. डोळयातून भक्ती प्रेम दुथडी भरून वाहू लागले. श्रीबाबांच्या गुलाबी मऊ पावलावर त्यांनी आपल्या अश्रूनीच अभिषेक केला. त्यांच्या पायाची पूजा केली. श्रीबाबा सस्मित मुद्रेने सर्व काही उपचार करून घेत होते. माईनी प्रेमाश्रूंनी भरलेल्या डोळयांनी बाबांकडे पाहिले तेव्हा आपला कृपाशिर्वादाचा हस्त त्यांनी माईच्या मस्तकावर ठेवला. एक आनंदाची लहर सर्व अंगातून निघून गेली. माई भान विसरल्या, आणि त्यांनी श्रीसाईचरणी आपली काया लोटून दिली. काही वेळाने त्या भानावर आल्या. तेव्हा बाबा म्हणाले, "माये जा आता विसावा घे झाले ना तुझ्या मनासारखे? काही काळजी करू नकोस. अल्ला तुझे भले करील." डोळयातून ओघळणारे अश्रू तसेच ठेऊन श्रीबाबांना पुन्हा एकदा वंदन करून त्या आपल्या निवासस्थानी आल्या. पेणसे तेथे आधीच आले होते. पत्नीचा हर्षनिर्भर चेहरा आज वेगळाच तृप्त झाल्यासारखा वाटत होता. ती आज वेगळयाच आनंदात होती हे चाक दिसत होते. न राहवून त्यांनी त्याचे कारण विचारले. तेव्हा आनंदाने गद्‌गदलेल्या स्वरात माई म्हणाल्या, "अहो, शिरडीतले महाराज खरोखरच देव आहेत. लोक काहीतरी बोलतात म्हणून आपण गैरसमज करून घेऊ नये. ज्याचे भाग्य असेल त्यालाच त्यांचे दर्शन होणार मी आपली अर्धांगी आहे. पत्नीने पतीच्या सुख दुःखात वाटेकरी व्हायचे असते. तसेच पतीनेही पत्नीच्या. आज मला स्वतःला दर्शन झाले पण आपणालाही ते व्हावे असे वाटते हो! हे पहा तुम्ही आजच महाराजांच्या दर्शनाला जा. त्या पुण्य पुरुषाचे दर्शन घ्या. त्यांच्या नुसत्या दर्शनाने तुमचे सगळे विकल्प दूर होतील. जा हो. जाल ना ?" पत्नीचा विशेष आग्रह पाहून पेणसेही द्वारकामाईत आले. त्यांना द्वारकामाईची पायरी चढू न देता बाबा ओरडले,"खबरदार पुढे येशील तर! मी ढोंगी आहे ना! लोकांनी माझे खोटे स्तोम माजवले आहे ना ? मी जातीने मुसलमान असून वेडा पिसा आहे ना ? मग कशाला आलास माझ्या दर्शनाला? अरे बाटशील हो तू येथे येऊन, तू उच्च वर्णी ब्राम्हण आहेस आणि मी नीचातला यवन आहे. केवळ त्या साध्वीने तुला इकडे पिटाळले म्हणून तू आलास. चालता हो येथून" श्रीबाबांचे बोलणे ऐकून पेणसे विरघळले. आपण इतक्या दूर अंतरावर पत्नी-जवळ श्रीबाबांविषयी निंदाव्यंजक बोललो ते त्यांना कसे काय कळले? त्यांनी बाबांच्या दर्शनासाठी पुन्हा वर जाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा बाबा

धोंडा घेवून त्यांचे अंगावर धावले. तेव्हा पेणसे घाबरून पळून गेले. नंतर श्री. अप्पा कुलकर्णी यांचा वशिला लावून त्यांनी श्रीबाबांचे दर्शन घेतले व क्षमायाचना केली. तेंव्हा श्रीबाबा म्हणाले, अरे पेणशा तुझ्या सुशील, सात्विक पत्नीच्या अंतर्यामी जी माझ्या दर्शनाची तीव्र तळमळ होती त्यामुळे तिला दर्शन झाले आणि तिच्या पुण्याईने तुलाही झाले. भक्ती असावी तर तिच्यासारखी. मी तिला दिसलो नव्हतो, माझे छायाचित्रही तिने पाहिले नव्हते पण लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन तिने मला परमेश्वर मानले आणि माझी नित्यनियमाने मानस पूजा केली यापेक्षा मला अधिक काय हवे आहे ?

जेथे चालते माझी भक्ती ।<br>
तेथे राहते पाठीशी माझी शक्ती ।।

श्री. पेणशांनी पुन्हा बाबांना वंदन केले व मज पामरावर कृपा करावी अशी प्रार्थना केली. तेव्हा त्यांनाही बाबांच्या शुभ हस्ताचा स्पर्श झाला आणि मनातील संकल्प विकल्प लहरी त्या स्पर्शाने पार विरघळून गेल्या. ⊙


**दसऱ्याच्या मुहूर्तावर "साईनिकेतन" दादर येथे प्रसिद्ध होत आहे**

## 'साईप्रसाद' दिवाळी ८४

ले. कर्नल निंबाळकर, डॉ. परचुरे, डॉ. चारुशीला गुप्ते, ॲडव्होकेट पोतदार, डॉ. इन्दुताई नाईक, श्री. सामंत, अशोक माहीमकर, सदानंद चेंदवणकर, दत्ताराम बारस्कर, रेखाताई दिघे, यांच्या साईसाहित्यासह वाचा.

श्रीसाईंचे जन्मगाव, माय बाप शोधणाऱ्याना दिलेले खरमरीत उत्तर — "विविध साईदरबार," साई संत–भक्त तसेच "बाबांना प्रत्यक्ष पाहिलेले पुण्यवंत" अशी अभिनव सकस सचित्र लेखमाला, साईकृपानुभव, साईगीते शिवाय श्री साईछबीचे मोहक रंगीत मुखपृष्ठ.

अंकाची किंमत ८ रु. + ४ रु. पोष्टेज मिळून रु. १२ फक्त M. O. ने पाठवून आपली प्रत आजच नक्की करा.

संपर्क :— सौ. वर्षा विजय हजारे, मा. व्यवस्थापिका, कृपाशू प्रकाशन, सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली (पूर्व) मुंबई–४०० ०६६.

# आम्ही केलेला श्रीबाबांचा पुतळा

श्री. व्ही. ए. किर्पेकर,
छायाचित्रकार)
४३५, सोमवार पेठ, कराड,
जिल्हा सातारा.

० आमच्या घरी माझ्या दोन्ही मुलांनी व मी साईबाबांचा शाडू मातीचा अर्ध पुतळा तयार केला आहे.

हा अर्धपुतळा १ फूट ८ इंच उंचीचा आहे. हा पुतळा अकस्मात तयार झाला आहे. आम्ही महात्मा गांधींचा पुतळा करण्याचा प्रयत्न सुरू केला होता परंतु तो आम्हा तिघांना साध्य झाला नाही. म्हणून श्री साईबाबांचे चित्र पाहून त्याचित्राचे त्यांच्या मूर्तीत रुपांतर झाले आहे. एक महिन्यानंतर तो आम्ही रंगवला व त्याची पूजा अर्चा करू लागलो व दर गुरुवारी रात्री त्याचे पुढे भजन करू लागलो व जमलेल्या स्त्री व पुरुष, मुलांना प्रसाद देऊ लागलो. हा पुतळा तयार केला त्यास अंदाजे ३५ वर्षे झाली आहेत. त्यावेळी आमचे कराड गावात व आम्हाला श्रीसाईबाबांची महती विशेष अशी काहीच माहीत नव्हती. फक्त ते एक मोठे संत आहेत एवढेच ठाऊक होते. त्यावेळी आम्ही पुतळ्याच्या गळ्यात जाड काळा गोफ व एक प्लॅस्टिकचा हार घालीत होतो. माझा फोटोग्राफीचा धंदा व धाकट्या मुलाचे ड्रॉईंग यामुळे पुतळा पुर्वाभिमूख बसविला असून त्यास काचेची सुंदर शोकेस केली आहे. बाबांच्या डोक्यास चांदीचा किरीट व डोक्यावर सुंदर अशी चांदीची छत्री आम्ही व येथील भक्त मंडळींनी केलेली आहे. सुवासिक फुलांचे हार पुतळ्यास घातल्यावर त्यांचे डोळ्यात नवचैतन्य निर्माण झाल्यासारखे दिसते, व आमची सर्वांची नजर त्यांचेकडे एकसारखी खिळून राहते, असा अनुभव येतो. दसरा, गुरु-पौर्णिमा, रामनवमी, या दिवशी आम्ही भजन पूजन प्रसाद असा कार्यक्रम करतो.

मी सध्या ४० वर्षे फोटोग्राफीचा धंदा कराडमध्ये केला. त्याच स्टुडीओच्या मोठ्या ६ खणी हॉलमध्ये ह्या पुतळ्याची स्थापना केली आहे. सध्या

माझे वय ७१ वर्षांचे आहे. पुतळ्याला वस्त्र वगैरे घालतात हे आम्हा उभयता नवरा बायकोला माहित नव्हते. त्याचप्रमाणे साईबाबा नवसास पावतात किंवा लोकांना त्यांचे दृष्टांत होतात याची पण आम्हाला कल्पना नव्हती. मी स्वतः व्हायोलीन तबला, पेटी वाजवितो. मला संगीताचा छंद आहे त्याच प्रमाणे माझी धाकटी मुलगी सौ. वासंती टेंबे ही सध्या संगीतविशारद आहे. रेडीओ स्टार आहे. माझा थोरला मुलगा चि. विजय हा पण उत्तम तबला वाजवितो त्यामुळे आम्ही अलीकडे १०–१२ वर्षात फक्त स्त्रियांचेसाठी भजनाचा क्लास काढला होता, व गुरुवार शुक्रवार, मंगळवार, साईबाबांचेपुढे त्यांची व इतर भजने करीत होतो. क्लासला एकंदर १५–१६ स्त्रिया असत त्यावेळी क्लासला श्रीसाईनाथ भजनी मंडळ असे नाव दिलेले होते. १० वर्षापूर्वी भजनाचा माझा एकच क्लास करायला चालू होता. लोकांना त्याचे कुतूहल होते व सर्व क्लासच्या स्त्रिया त्यामुळे साईभक्त झाल्या होत्या. असा भजन पूजनाचा क्रम चालू असताना एक गोष्ट अशी घडली

आमच्या श्रीसाईनाथ संगीत भजनाच्या क्लासमधील एका मोठ्या श्रीमंत व भावीक बाईची मुलगी लग्नाची होती. ती सुशिक्षित व देखणी मुलगी होती व सुस्वभावी होती. मुलाला व त्याच्या घरातील सर्व मंडळींना मुलगी पसंत पडली. मुलगा देखणा व चांगला पगारदार होता. मुलाकडील मंडळींच्या ठिकठिकाणच्या नातेवाईकांना मुलगी दाखवणेचा कार्यक्रम सुरू झाला त्यांना पण मुलगी पसंत पडली. एकमेकाचे येणे जाणे सुरू होते. २ ते ३ महिन्यांनी आपण लग्नाच्या याद्या करू असे वराकडील मंडळींनी सांगितले. त्याप्रमाणे मुलीच्या पालकांनी दुसरीकडे स्थळ न पाहता मुलाच्यावर विश्वास ठेवून राहिले. परंतु अचानक तीन महिन्यांनी मुलाच्या कडून नकार आला व तुमचा योग नाही असे कळवले. त्यामुळे मुलीकडील सर्व मंडळी निराश झाली, नर्व्हस झाली. कुठलेही कारण नसताना इतक्या दिवसानंतर नकार आला त्यामुळे त्यांना काही सूचेना. नेहमीप्रमाणे त्या मुलीच्या मातोश्री गुरुवारी आमच्या येथे भजनाच्या क्लासला आल्या होत्या तेव्हा त्यांचा चेहरा सौ. ला उतरलेला दिसला. तिने त्या बाईंना विचारले आज अशा कां नर्व्हस दिसता ? तेव्हा त्यांनी मुलीच्या लग्नाची वरील सर्व हकिगत सांगितली व त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. तेंव्हा माझ्या सौ. ने त्यांना सहज सांगितले की आपल्या साईबाबांच्या पुढे नवस बोला आठ दिवसात तुमच्या मुलीचे लग्न दुसऱ्या ठिकाणी नक्की जमेल व स्थळ उत्तम जमेल काळजी करू नका आणि त्या प्रमाणे खरोखरच

त्यांच्या मुलीचे लग्न आठ दिवसात ठरून यात्रा झाल्या व स्थळ सुरेख मिळाले. ठरल्याप्रमाणे तिथी निश्चित होऊन मुहूर्त ठरला. त्यांनी साईबाबांना पेढे वाटले., व लग्नसमारंभ पार पडताच साईबाबांना सॅटीनच्या भारी कापडाचे मोरपंखी रंगाचे वस्त्र त्याला जरीचे काठ लावून पांघरले. लग्नाचे वऱ्हाड परगावी जाताना त्यांच्या मालकांनी साईबाबांना निमंत्रणपत्रिका व लाडू ठेवून मगच ते परगावी लग्नाला गेले. हे त्यांचे मालक पूर्वी अश्रद्धावान होते परंतु ते पण आता साईभक्त बनलेले आहेत. विशेष म्हणजे त्यांचे जावई व त्यांचे घरातील सर्व मंडळी अत्यंत साईभक्त आहेत. आमच्या येथील साईबाबांच्या पुतळ्याला नवस करून वस्त्रार्पण करणाऱ्या ह्या पहिल्याच साईभक्त होत. आमच्या भजनाच्या क्लासमधील त्यावेळच्या ह्या श्रद्धावान व भाविक साईभक्त आहेत. हे आम्ही आवर्जून सांगतो.

# श्रीबाबांची कृपा व श्री दासगणूंचे दर्शन

बाबांनी माझ्या पत्नीला दम्याच्या मोठ्या आजारातून संपूर्ण बरे केले

हा आमचा अनुभव ३२ वर्षापूर्वीचा आहे. आम्ही उभयता दोघे व माझी धाकटी बहीण असे तिघे शिरडीत बाबांचे दर्शनास गेलो होतो. त्यावेळी तेथील एकंदर परिस्थिती लहान प्रमाणात होती. समाधी मंदिराजवळ ५–६ खोल्या होत्या व मोठ्या पटांगणात हार फुले फोटो, पोथ्या यांची खोकी व शेडस् होत्या. आम्ही रोज ४ आणे याप्रमाणे भाड्याने एक खोली समाधी मंदिराजवळ घेतली होती. आमचा तेथ मुक्काम होता. रोज पहाटे ४ वाजल्या–पासून आम्ही तेथील काकड आरतीपासून सर्व कार्यक्रम पहात होतो. एक दिवस रात्री माझा व्हायोलीनचा कार्यक्रम श्री बाबांचे पुढे मी केला होता. त्यावेळी मला तेथील व्यवस्थापकांनी एक नारळ, बाबांचा हार व १ रुपया प्रसाद म्हणून दिला होता. तो रुपाया अद्यापी आमच्या देवाच्या पूजेत असतो. एकंदर आमची शिरडीची वारी उत्तम प्रकारे झाली. त्यानंतर आम्ही कराडला परत आलो. दिवाळीनंतर शिरडीत थंडी व गारठा फार त्यामुळे माझ्या पत्नीला (सौ. शांताबाई हिला) खोकला, पडसे, झाले. त्यासाठी आम्ही येथील डॉक्टरांचे उपचार केले परंतु त्याचे रुपांतर दम्यात झाले. गावातील डॉक्टर वैद्य यांचे औषधाने गुण येईना म्हणून आम्ही पुणे, वाई, मिरज, येथील हॉस्पिटल मध्ये

प्रकृती दाखवून उपचार केले. एक्सरे फोटो काढण्यापासून सर्व तपासण्या केल्या गुण नाही. त्यामुळे पत्नीची प्रकृती अत्यंत क्षीण झाली. खोकल्याची ढास तासभर लागे, व तांब्या तांब्या कफ पडे. अन्नपाणी कमी झाले. मला दोन मुलगे आहेत. एके दिवशी सौ. च्या मैत्रिणीने सांगितले की तुम्ही पंढरपूरला जा व तेथे म्हैसूरकर महाराज आहेत, त्यांचे आयुर्वेदिक देशी औषध घ्या. त्याने गुण येतो. त्याप्रमाणे आम्ही ३ मुलांना घरी ठेवून एका लहान मुलीला घेऊन आम्ही तेथे पोहोचलो. तेथील एका बडव्यांचे घरी उतरण्याचे ठरविले. बडव्यांचे घरी दारात पाऊल ठेवताच दारासमोरील बाबांचा फोटो अचानकपणे दिसला. येथे हा फोटो अचानक कसा आला याचे नवल वाटले. आम्ही रात्री मुक्काम केला व सकाळी म्हैसूरकर महाराज गावाबाहेर एका मळ्यात बंगला बांधून राहतात असे समजले. टांगा करून आम्ही निघालो. जाताना तेथील मंडळींनी येथे श्री बाबांचे भक्त श्री. दासगणू महाराज आहेत. त्यांचा नदीकाठी मठ आहे जमल्यास तो पाहून त्याना भेटून या. ठरल्याप्रमाणे एक तासात बंगल्यावर पोहोचलो. मंडळींची प्रकृती दाखविली. पथ्य वगैरे सांगून औषध देतो बरे वाटेल हा कफक्षय नाही. काळजी करू नका. असे त्यांनी सांगितले व १ महिन्याच्या औषधास ८० रु. द्यावे लागतील तेव्हा असे सांगितले. परंतु आम्ही फक्त भाड्या पुरतेच पैसे कसेबसे नेले होते. परंतु आमची त्यांना कीव आली त्यांनी नंतर पैसे पाठवा असे सांगितले. ही श्री. विठ्ठलाची, व श्री. बाबांचीच कृपा म्हणावी लागेल. आम्ही परत गावात येऊन श्री पांडुरंगाचे दर्शन घेतले व श्री. संत दासगणू महाराज यांचे मठावर गेलो. त्यांना आम्ही वंदन करून येण्याचे कारण सांगितले. दासगणूंची प्रकृती त्यावेळी जरा ठीक नव्हती. त्यांनी माझ्या पत्नीला एक (साईनाथस्तवनमंजिरी पोथी) दिली, व बाबांच्या पुण्यतिथीला प्रसादाचे २ बुंदीचे लाडू आपल्या बहिणीकडून आणून आमचे हातावर प्रसाद म्हणून दिले. व त्यांनी सौ. ला सांगितले की ही स्तवनमंजिरी वाचीत जा व उदी लाव तुला अपमृत्यु येणार नाही. आम्हाला जरा धीर आला व लगेच आम्ही कराडला परत आलो. नंतर मंडळींना व एका लहान मुलीला तिच्या माहेरी पाठविले व तेथेच विश्रांती व औषधे घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिलेल्या स्तवनमंजिरीचे वाचन, उदी व उपचार सुरू केले. दासगणू यांनी दिलेली पोथी अद्यापी आमचेजवळ आहे माझ्या पत्नीला फारसे बोलता पण येत नव्हते इतका अशक्तपणा आला होता. परंतु १५ दिवसात ती श्री बाबांच्या आरत्या, स्तोत्रे, म्हणू लागली व तिचा दमा व खोकला बराच कमी झाला. एक महिन्यात ती वाचली, व आता

त्यानंतर तिला खोकला व दमा झाला नाही. तिचे वय ६४ वर्षांचे आहे. माझ्या पत्नीला व आम्हास सर्व कुटुंबियांना बाबांचा कधीही विसर पडणे शक्य नाही.

धन्य ती साई माऊली व धन्य ती साई कृपा.

☆

# श्रीसाईबाबांनी मृत्यूपासून कोणाला कसे वाचविले

(१) "चल भटूरड्या खाली उत्तर" असे शद्ब प्रहार करून बाबांनी शामाचे सर्प विष उतरविले.

(२) प्लेगच्या गाठी आपल्या दोन्ही जांघेवर घेवून बाबांनी खापर्ड्यांच्या मुलाला प्लेगपासून वाचविले.

(३) बापूगीरबरोबर उदी व "आरती साईबाबा"ही आरती पाठवून दिली व नानासाहेब चांदोरकरांच्या मुलीचे प्राण वाचविले.

(४) बाबांनी धुनीमध्ये हात घालून भट्टीत पडलेल्या लोहाराच्या मुलीला वाचविले.

(५) भिमाजी पाटलाच्या स्वप्नात जाऊन छडीने त्याची पाठ फोडून काढली व त्याच्या छातीवर वरवंटा फिरवून त्याचा क्षयरोग बाबांनी घालविला

(६) बापाजीच्या बायकोसाठी बाबांनी उदी पाठवून दिली व तिची भयंकर प्लेगपासून सुटका केली.

(७) सगुण मेरू नाईक यांना अक्कलकोट महाराजांची पोथी आंबडेकराना वाचायला द्यायची बुद्धी दिली व आंबडेकर यांचा आत्मघात वाचविला.

(८) शामाला मिरीकरांबरोबर चिथळीला पाठवून दिले व मिरीकरांचे सर्पापासून संरक्षण केले.

—श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.

❋ ❋

# – मनःशक्ती –

–श्री. पांडुरंग शंकरराव भुजबळ
३७७, सोमवार पेठ सातारा.

० सृष्टी ही निरनिराळ्या शक्तींनी भरली आहे. शक्तिशिवाय सृष्टी नाही. अशी या जगाची स्थिती आहे. सृष्टी निर्मात्याने प्रत्येक जीवजंतूमध्ये एक गुप्त शक्ति निर्माण केली आहे. ती दिसत नाही, दाखविताही येत नाही. पण ती मात्र आपल्या शरीरावर अंमल करते, व त्या शक्तीच्या जोरावरच आपण सर्व कायापालट करून चांगले किंवा वाईट परिणाम भोगत असतो. ह्याला कारण एकच, आपल्या शरीरात असलेले मन, मनाची शक्ति हीच आपल्या जीवनाची सुकाणू आहे. ते जशी दिशा दाखवेल त्याचप्रमाणे आपला जीवनरुपी गाडा त्यांचे तालावर पाहिजे तसा नाचत असतो. मग त्याचे परिणाम काहीही होवोत आपणाला त्याचे तंत्राने चालावे लागतेच. जगात शक्तिचे प्रकार पुष्कळ आहेत. वीजशक्ती, वायूशक्ति. उष्णतेची शक्ति. शरीर शक्ती ह्या सर्व शक्ति आपण आपल्या डोळ्यांनी त्याचे परिणाम व कार्य पाहू शकतो पण एकच अशी मनःशक्ती आहे की, ती आपण आपल्या डोळ्यांनी पहात तर नाहीच व आपणही दुसऱ्यास दाखवू शकत नाही, व तीही शक्ति आपले दर्शन देत नाही. फक्त आपला अंमल मात्र करते. व त्या-प्रमाणे आपली जीवननौका चालते.

आपल्या मनःशांतीचे चांगले किंवा वाईट परिणाम आपले आपणच भोगावे लागतात. इतरांना दोष देवून काय उपयोग! ते दोष आपल्यातच शोधा. प्रथम आपण आपले कर्तव्य मनःशक्तिचे जोरावर पार पाडावे, निराशा-वादी न होता. मन खंबीर राखावे. त्याला इतरत्र सैरावैरा धावू देऊ नये. मन हे आपल्या शरीराचे बटण (कळ) आहे. ते दाबताच त्याचा प्रभाव सर्वत्र पडतो. सुखाने आपले मन हुरळून जाऊ देवू नकात अगर दुःखाने ते त्रस्त अगर व्यग्र होऊ देवू नका. बंधाचे व मोक्षाचे कारण हे सर्वस्वी मनच आहे.

परमेश्वर आपणाला काहीच देत नसतो, ज्ञान पाहिजे असेल तर वेदांत समजून घ्या. त्याचे मनन, चिंतन करून ते आचरणात आणा. आपले मन

समजून घ्या, व ते शुद्ध करीत जा. त्याला तुम्हाला पाहिजे तसे वळण लावा. मग सुख दुःखाचे पलीकडे जाल. सुख दुःखाकडे लक्ष देऊ नका. त्याचेबद्दल समभाव राखा. म्हणजे आपण मोक्षाचे अधिकारी होतो. आपल्या आयुष्यात निरनिराळ्या प्रकारच्या घटना घडतात. दुःखकारक, मानहानीकारक प्रसंग अनेक येतात. ते आपल्या हिताकरिताच आहेत. असे आपण समजून मनाची समजूत घालावी. त्यापासून संताप वगैरे काही न करता त्यापासून बोध घ्यावा, व ते गुरुच आहेत असे मानावे. मनाचा समभाव बिघडू देऊ नये.

आपल्या जीवनात आपण एकांगी पडल्यानंतर आपणास शंका, संशय आल्यास आपल्या आतील मनाचा निर्णय मानावा तो बरोबर असल्याचा अनुभव येईल. अंती तोच योग्य ठरेल. विचारांचा गोंधळ नसला म्हणजे निर्णय बरोबर ठरतात प्रतिभा जागृत होते. ते मन इतरांना पण आनंद व शांती देते. मनातील विचार गेले की शांति मिळते. म्हणून तुमचे निर्णय तुम्हीच पण विचारपूर्वक मनाचा कौल घेऊन घ्या व तेच परिणामी फायद्याचे होतात. दुसऱ्याने शिकवलेली पोपटपंची म्हणजे दुसऱ्याने तयार केलेला जड पदार्थ तो पचण्यास फार जड असतो. म्हणून माझा असा ठाम विश्वास आहे की, आपले मन हीच मनोदेवता मानावी, व तिच्यावर विश्वास ठेवून कोणत्याही चांगल्या अथवा वाईट प्रसंगी आपले निर्णय आपणच घ्यावेत. ते आपल्या सद्विवेक बुद्धीला म्हणजेच मनाला स्मरून घेतले तर तेच इतरांना व आपणाला आनंद व शांति देते. मनातील विचार गेले की शांति मिळते, व समाधान लाभते. व आपण आपल्या मनावर विश्वास ठेवल्यामुळे आपण त्यात विजयी होतो. व आपला तो विजय चिरकाल मनःशांती देणारा असतो. म्हणून मनावर ज्याची श्रद्धा व विश्वास आहे. त्याने न्यायालयात अगर कुठेही जाबजबाब देण्याची पाळी येईल. त्यावेळी प्रथम कसलाही अभ्यास व शिकवण न घेता आपले मन सांगेल त्याप्रमाणेच उत्तरे द्यावीत, व तीच परिणामी फलदायी तर होतातच. म्हणून समाजात नीट म्हणजे हास्यास्पद न होता वावरावयाचे असेल तर मनुष्याच्या अंगी ही मानसिक सावधानता व चलाखी असावयास पाहिजे. म्हणूनच मनुष्याने आपले मन हेच औषधासारखे हितावह असे विचार-पूर्वक बनविले पाहिजे. ह्याकरिताच प्रत्येक मानवाने सत्पुरुषावर श्रद्धा ठेवली पाहिजे. सत्पुरुषाच्या सहवासाने मन शुद्ध होते, व मनःशक्ती वाढते, व खंबीर रहाते. रोगाने ग्रस्त होत नाही. म्हणून सत्संगती हे एक स्वतंत्र रसायन आहे, आणि ते रसायन, श्रद्धा, सबुरी, आत्मविश्वास, मनःशक्ती ह्यांनी युक्त

असे आहे. त्याचे जोरावर आपण आपली जीवननौका यशस्वी चालवू शकतो. शरीरात असणाऱ्या गुप्त गोष्टी मनाच्या भावनेने प्रगट होतात, व त्याच आपल्या नाशाला व सुखाला कारणीभूत होतात. म्हणून मनःशक्ती हीच अद्वितीय शक्ति आहे. तिचा वापर मानवाने करावा, व त्याचे निर्णयावरच आपण आपले कार्य करीत रहावे. मन दुर्बल होऊन कधीच ढळू देऊ नये. मन एकदा ढळले तर तुम्ही कितीही बलवान, हुशार, बुद्धीमान असला तर ते कोणतेही कार्य करू शकत नाही. इतकी मनःशक्ती प्रभावी आहे. म्हणून शारिरीक मानसिक, आगन्तुक व स्वाभाविक या चारही प्रकारच्या रोगाचे कारण मनच आहे. म्हणून मन हे आपल्या शरीरात काय करते आणि काय करू शकत नाही. याचा शांतपणे विचार करावा व त्याप्रमाणे आपण वागत रहावे. त्याचा निर्णय हा कायमचा मानावा आणि अंती तोच फलदायी होतो, अशी आमची श्रद्धा आहे.

# आयुष्याचे मर्म कळले तुझ्यामुळे

तुझ्यामुळे प्रथम आले शिर्डीत ।
मन प्रसन्न झाले तुझ्यामुळे ॥

तुझ्यामुळे कळला सेवा भाव ।
आयुष्याचे मर्म कळले तुझ्यामुळे ॥

तुझ्यामुळे कळली भुकेची किंमत ।
पर दुःख यातना कळल्या तुझ्यामुळे ॥

तुझ्यामुळे कळले जन सेवेचे व्रत ।
खरे चैतन्य देखिले तुझ्यामुळे ॥

तुझ्यामुळे कळले श्रद्धेचे बीद ।
कळले मर्म सबूरीचे तुझ्यामुळे ॥

तुझ्यामुळे कळले खरे जीवन ।
जीवन जगता सुख मिळाले तुझ्यामुळे ॥

—डॉ. कु. इंदू नाईक
सीताकुंज, लोणावळा.

# तारणकर्ते साईबाबा

—सौ. सुलोचना म. जोशी
नागपूर

० १९८२ ची राखी पौर्णिमा! गेले जवळ जवळ वर्षभर मासिक त्रास प्रमाणाबाहेर होता. त्यामुळ अशक्तता येत होतीच. ती भरून निघण्याची उसंत नव्हतीच. होमीओपॅथीचे औषधोपचार सुरू होतेच, पण म्हणण्या सारखा गुण नव्हता. पण आज राखी पौर्णिमेला अचानक खूपच लवकर अवेळी पाळीचा त्रास व तोही प्रमाणाबाहेर सुरू झाला. म्हणून आम्ही उभयता काळजीत पडलो. अॅलोपॅथीच्या फॅमिली डॉक्टरकडे जाऊन औषधोपचार तातडतोब सुरू केला. त्यांच्या सल्ल्यानुसार पूर्ण विश्रांती (बेड रेस्ट व औषधे घेऊनही फरक नव्हता. अंथरूणात कड फिरवणे त्रासाला आमंत्रण होते घरात बाई जात कुणीच नाही. बरोबरीची दोन्ही मुलेच! त्यामुळे परिस्थिती अवघड लाजीरवाणी केवीलवाणी! गांभीर्याची जाण मुलांना देणे कठीण! जवळ जवळ दीड–दोन महिने औषधोपचार व विश्रांती घेऊनही गुण येईना पुन्हा होमीओपॅथीच्या डॉक्टरचे घर जवळ केले. डॉक्टर तज्ञ प्रकृतीची माहीती असलेले केस पूर्ण माहीत असलेले. पण गुण येईचना. शक्ती झपाट्याने कमी होत चाललेली. अशक्तता कमालीची आलेली. त्यात रक्तदाब वाढलेला. ही एक वेगळीच काळजी उत्पन्न झाली. शेवटी होमीओपॅथ डॉक्टरच्या सल्ल्याने स्त्रीरोग तज्ञाकडून आंतरिक तपासणी करून घेतली. त्यांत काहीच निघाले नाही. ट्युमर वगैरेची शंका फिटली. श्रीबाबांची उदी घेणे व करूणाभाकणे सदैव सुरूच होते. स्त्रीरोग तज्ञाचे रिपोर्ट व औषधे घेतली आहार वाढविला. काळजी घेणे पण चालूच होते. पूर्ण विश्रांती चालूच होती. हा रिपोर्ट पाहून होमीओपॅथ डॉक्टरने औषध योजनेत आवश्यक बदल केला पण त्रास कायम! हे व मुलं ऑफिस अभ्यास सांभाळून घर सांभाळताना मेटाकुटीला आले होते. माणसांच्या हातात घराची घडी पूर्ण विस्कटून गेली होती. आला दिवस रेटणे सुरू होते. हे सारखे समजूत घालायचे की बाबा आपले सर्वस्व आहेत. त्यांच्यावरची श्रद्धा ढळू देऊ नकोस. "बाबा! लवकर बरे करा! रक्तदाबाचे झेंगट नष्ट करा! अशी करूणा भाकणे सुरूच होते तेवढाच एक आधार होता. काही लोक तर शस्त्रक्रियेचा सल्ला देत. औषधो–

पचार, दूध, फळ, पालेभाज्या ह्या सगळ्या पैशापरी पैसा व वेळेपरी वेळ जातच होता. त्रास मात्र कायम! बाबांच्या पोथीचे नित्य नियमीत वाचन चालू होते. शेवटी एक दिवस मी घरात एकटीच होते. पोथी वाचायला घेतली व बाबांच्या फोटोसमोर मनसोक्त हमसा हमसी रडून घेतले. "इतका त्रास होतो. तुझी मनधरणी सुरूच आहे. फरक पडतच नाही. हे असे का? काय पाप केले आम्ही? तुला कीव अशी येत नाही. त्यापेक्षा मरण दे!" असं म्हणून पोथी उघडली. मशीदमाईचा अध्याय होता. "अल्ला अच्छा करेगा! मशिदीच्या अंकी विसावला त्याचा वेडा पार झाला. त्याला श्रीहरी रक्षील" वगैरे बाबांची आश्वासने होती! मनाला बरे वाटले. त्याच दिवशी आमचे एक परिचित (तेही एका सत्पुरूषावर श्रद्धा ठेवून आहेत भक्त आहेत. सेवक आहेत.) सहकुटुंब सहज आले. त्यांच्या सौ. म्हणाल्या "कशाला काळजी करता हो? बरे वाटल! रडू नका. काळजी करू नका. रात्री स्वप्नात श्री साईबाबा आले. ते त्यांनी सांगितले की तुझ्या संग्रही असलेल्या कपड्यातील एक विशिष्ट वस्त्र वापरू नकोस." त्याच स्वप्नात माझे स्वर्गीय सासरे पण आले. स्वप्न सुचनेनुसार ते वस्त्र पड़दणीला टाकून दिले आणि त्रास कमी व्हायला लागला. सांगायचे आश्चर्य म्हणजे लौकरच त्रास अजिबात बन्द झाला! शक्ती झपाट्याने वाढू लागली. सगळी कामे मी करू लागली. श्री बाबांचीच कृपा! वेळेवर स्वप्नात सूचना दिली नसती तर प्रकृती तर ह्या थराला गेली होती की न जाणो काय झाले असते? पण मारणाऱ्यापेक्षा तारणारा श्रेष्ठ असतो हेच खरे! श्रीबाबांच्या चरणी नेहमी एकच प्रार्थना की, बाबा आपल्या ह्या अजाण बहीणीवर अशीच मायेची पाखर कायम ठेवा व आम्हा सगळ्यांच्या हातून सेवा करवून घ्या."

त्या अगाधशक्ती अघटीतलीला धारकाला कोटी कोटी प्रणाम !

श्री कुमारसेन गुप्ते दिग्दर्शित व निर्मित 'शिरडीके साईबाबा' या हिन्दी नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग येत्या विजया दशमीला ४ अक्टोबर ८४ रोजी रविन्द्र नाट्यमंदिर प्रभादेवी येथे होत आहे.

# सद्गुरु साईचरणी अवरित प्रणाम

—सौ. शैला रमाकांत पुरव,
१०, व्हाईट लिली सोसायटी
डी. एस. बाबरेकर मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०२८.

० बाबांची आपल्या भक्तगणांकडून एकच अपेक्षा असते ती म्हणजे, 'तुम्ही अगतिक होऊन माझे स्मरण करा की मी तुमच्या हाकेला धाऊन आलोच.' ह्याचीच प्रचीती मला कशी आली ती पहा—

माझ्या यजमानांना गेल्या मार्चमध्ये बढती मिळाली व त्यांची बदली हैद्राबादला झाली. तिथला कडक उन्हाळा व विशिष्ट प्रकारचा आहार त्यांच्या प्रकृतीला मुळीच मानवेना व मला तर मुलांच्या परीक्षांमुळे तिथे जाता येईना. वाटले होते आता ६ महिन्यात ह्यांना मुंबईत येण्याचा योग आहे. पण प्रत्येक वेळी बाहेर पडणाऱ्या लीस्टमध्ये ह्यांचे नाव नसायचे. माझे देवीमाहात्म्य व बाबांच्या चरित्राचे वाचन चालूच होते. असेच ८ महिने गेले. ह्यांच्या पत्रातून नैराश्याचाच सूर होता. माझाही धीर हळू हळू खचत चालला होता. तेवढ्यात मला माझ्या आप्तांकडून 'तू बाबांना अशी विनवणी कर की तुझी मनोकामना पूर्ण झाल्यास तू साईलीलेत हा अनुभव छापावयास देशील,' असे सांगण्यात आले आणि योगायोग असा की त्याचवेळेस माझी भाची साईसप्ताह करणार होती. त्यामुळे मी तिला तसे बाबांना म्हणावयास सांगितले. अन् काय आश्चर्य! मार्चच्या पहिल्या पंधरवड्यात ह्यांची बदली परत मुंबईला झाली. जेव्हा सर्व उपाय हरले व मी श्रद्धापूर्वक साईचरणी विनम्र झाले तेव्हा बाबा जसे माझ्या हाकेला आले तसेच आम्हा तुम्हा सर्वांच्या हाकेला धावून येवोत हीच सदिच्छा!

# उदी नव्हे ही अमृतवल्ली

उदी नव्हे ही अमृतवल्ली श्रीसाईची असे
धुनी चेतवूनी स्वःये निर्मिले 'भस्म–गंध' छानसे

दिव्य औषधी जडीबुटीतील
अमोघ शक्ती मंत्र धुनीतील
अंगारातून पुलकित होऊन
भस्म शिवाचे हंसे .....

साई पदी त्या दृढ आलींगन
नित्य असु द्या मनांत पूजन
उदीच केवळ साई रुपाने
सदव जागतसे .....

नित्य निनादो धून मनांतून
श्रीसाईच्या गीत भजनांतून
प्रसाद म्हणूनी उदी सेवुनी
तृप्त होऊ या कसे ......

व्यथा असो वा असोत व्याधी
श्रीनाथांची दिव्य समाधी
जाळून टाकील सर्व उपाधी
भक्ती चांदणे हंसे .......

माथी लावा घ्या पाण्यातून
उदी नव्हे हे अमृत सेवन
देईल सकला ते संजीवन
मनात श्रद्धा वसे .......

–श्री मधुकर कृष्णाजी विचारे,
१५, बी भक्ति–सुधा, वाकोला पाईप लाइन
दत्त मंदीर रोड, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई ४०० ०५५.

# साई मला दिसले

शिरडी क्षेत्री, पाय लागले पुण्य फळा आले
भाग्यची माझे साई मंदिरी, साई मला दिसले ।।

अजन्म अमर ते साईश्वर हो शिरडी अवतरले
गोदा तीरीं भक्तजनांचे, भाग्य जणु प्रसवले ।।

'साई साई', 'जयश्री साई' मंदिर दुमदुमले
साई शक्तिचे विराट दर्शन, भक्तजनां झाले ।।

शिरडी क्षेत्री, भक्तजनांचे पूर महा लोटले
मंदिरी येऊनी घेता दर्शन, शांत चित्त जाहले ।।

—श्री. दा. र. दळवी,
५।७८, बी. पी. टी. कॉलनी, रेनॉल्डस रोड,
वडाळा, मुंबई ४०० ०३७

# नित्यनेम

सकाळी उठोनी करा साई स्मरण
साई चुकवील जन्म मरण

स्नान करोनी करा साई पूजा
साई सारखा प्रेमळ नाही दुजा

दुपारच्या वेळी द्या साईशी भोजन
करिल तुमचे तो दैन्य हरण

सांजच्या वेळी करा करा साईनामाचा गजर
साई ठेवील सतत तुम्हावरी नजर

रात्रीच्या वेळी नित्य नेम ध्यानाचा
साई राहातो सतत मग अमुचा

—श्री. यशवंत विचारे
दयानंद बिल्डींग, डोंबिवली

# औक्ष वाढो कुंकवाला

माते माझे साई धावत ये लवकरी
संकट पडले भारी आई धाव लवकरी
सगेसोयरे सारे फसवणूक करीतो

गम्मत बघती माणसे रक्ताची
पैशासाठी दुश्मन भाई ॥ १ ॥

तुम्हा विण कुणी न जगी माझे साई
सारी पैशाची नाती स्वार्थी ॥ २॥

होईल कधी हा संसार पूरा
नौकेत तुम्हा विण नाही बाबा वाव
कुंकवाची ती भितीच वाटे मला
कुंकु माझे तुमच्याच हाती बाबा

अक्षय राहो माझ्या भाळी कुंकवाचा टिळा
संतती आणि संपत्ती राहो सुखी सदा
(मुलगा) (पती) मागणे हेची साईनाथा

—सौ. रश्मी रमेश कोरे.
कादरी वाडी, एल. जे. रोड,
बंगला नं. ४ रुम नं. ५,
माहीम, मुंबई ४०० ०१६.

# साईराया माझी माया

(चाल : एक परदेशी मेरा दिल ले गया)

साई राया माझी माया करशिल का ?
कधी तरी माझ्या साठी धावशील कां ? ॥ धृ ॥

कसं किती सांगू तुला कळवळतो मी
नाही काही माझी माया तुजसी म्हणोनी ॥

माझी दया तुला देवा येईल का ?
माझ्यासाठी कधी तरी धावशील का ? ॥ १ ॥

साईनाथा तुजला शरण सदा मी।
दृढ भक्ती माझ्या मनी ठसवी म्हणोनी ॥

माझ्या मनीं सदा तुझी भक्ती असु दे।
माझी माया तुजसी नित्य असु दे ॥ २ ॥

साई राया तुजला प्रार्थू किती मी।
प्रार्थून थकलो पाही मनी मी ॥

तरी सर्वा म्हणे मी म्हणा साईराम ॥
सर्वा मनी तुझी भक्ती म्हणे नथूराम ॥ ३ ॥

—श्री. नथूराम दादाजी जोशी
मु. पो. केळवारोड,
ता. पालघर, जिल्हा ठाणे.

★ ★ ★

# पाहिली शिरडीत मी पंढरी

पाहिली शिरडीत मी पंढरी
त्रिभुवन विश्वावरी ।।
थोर विश्व ते वैभव सारे
पाहून आले भरूनि डोळे
रुप मनोहर देह सावळे
लोचन तृप्ती आज जाहली
पाहिली शिरडीत मी पंढरी
त्रिभुवन विश्वावरी ।। १ ।।
पुढे सुगंधी सुमने अति
सुधे परी तयास मति
पुढे झळकती दिप ज्योती
भावे पुजती बालक नारी
पाहिली शिरडीत मी पंढरी
त्रिभुवन विश्वावरी ।। २ ।।
जगतास सुख लाभले
थोर थोर ते होऊनी गेले
जीवन तयानी सेवेसी वाहिले
तूच नाथा दीनांचा कैवारी
पाहिली शिरडीत मी पंढरी
त्रिभुवन विश्वावरी ।। ३ ।।
दर्शन घेता द्वारका सदन
भावपूर्ण करती नमन
चमत्कार दिपवती लोचन
आठवता मन द्रवे भारी
पाहिली शिरडीत मी पंढरी
त्रिभुवन विश्वावरी ।। ४ ।।

—कु. रक्षा वागळे
डी १०, मॉडेल हाऊस
प्रॉक्टर रोड, मुंबई ४०००४.

# समाधीमधूनी जागे व्हा

साईबाबा समाधीमधुनी जागे व्हा लवकरी
सत्गुरु उठा उठा झडकरी। बाबाऽऽ उठा उठा लवकरीऽ॥ धृ॥

भोळ्या भाळ्या भाविकावरी कां रुसले श्रीहरी
सत्गुरु उठा उठा झडकरी। बाबा उठा उठा लवकरी॥ १॥

खचले धैर्य काळ पाहूनी। संकट आले अम्हावरी
चिंतातुर झाले सारे। धावुनी या सत्वरी॥ धृ॥
सत्गुरु उठा उठा झडकरी। बाबा उठा उठा लवकरी॥ २॥

दया ना तुमसी कशी ना येई। कुठे जावुनी बैससी
तुझ्या लीलेचे वर्म न समजे। भुलविसी माया जाळी
सत्गुरु उठा उठा झडकरी। बाबा ऽऽ उठा उठा लवकरी॥ ३॥ धृ

चैन ना आम्हां तुम्हां वाचुनी। घेवुनी या वासुरी
चित्त न लागे कुण्या न कामी। मन मोहन गिरीधारी
सत्गुरु उठा उठा झडकरी। बाबा उठा उठा लवकरी॥ धृ॥ ४

—श्री. के. पी. पहाडे,
झेंडा चौक, धरम पेठ
नागपूर.

# नमस्कार

हे सद्‌गुरु साई नाथा कृपाळा नृपाळा
या दीनेचा नमस्कार घेई वेल्हाळा

हे सच्चिदानंदा आनंद कंदा
दाखवी मज तव पदा

हे प्रभोविभो जगत माऊली
करि मजवरी कृपेची साऊली

हे दीनांच्या नाथा सद्‌गुरु नाथा
ठेविते तव समाधीवरी माथा

हे सकळ विश्वाच्या माय बापा
हरि रे हरि भव भय तापा

हीन दीन अज्ञानी विसावले तव पदी
नमस्कार माझा तुज शिरडीपती.

—सौ. सुनिता यशवंत विचारे
दयानंद बिल्डींग
डोंबिवली.



॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

# जाहीर आमंत्रण

## श्री साईबाबा सेवा ट्रस्ट मुंबई

रजिस्टर्ड ई ९८६९/मुंबई

'साईदरबार' कल्याणदासवाडी. जयहिंद सिनेमा समोर.
डॉ. आंबेडकर रोड, मुंबई–४०० ०१२.

## ★ श्री साईबाबांची ६६ वी पुण्यतिथी उत्सव सोहळा ★

### ★ श्री साईसेवा विशेषांक (स्मरणिका) प्रकाशन ★

### साई स्नेह–सम्मेलन

**मंगळवार दि. २ ऑक्टोबर ८४ ते मंगळवार दि. ९ ऑक्टोबर १९८४**

**सम्मेलन उद्घाटक** – साईभक्त श्री. भाऊ डिचोलकर.

**श्री साईसेवा विशेषांक प्रकाशन** – मा. महादेवशेठ वि. वेसरकर.
(बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर्स एम.इ.एम.)

**प्रमुख पाहुणे** – मा. गणपतराव सामंत
(प्रमुख श्री देवी महालक्ष्मी ट्रस्ट, मुंबई)

**प्रमुख कार्यक्रम—**

मंगळवार दि. २–१०–८४ – सायं. ७ वा. श्री साईबाबांच्या प्रतिमेची व पादुकांची पालखी मिरवणूक.

बुधवार दि. ३–१०–८४ – श्री साईसेवा विशेषांक (स्मरणिका) प्रकाशन.

गुरुवार दि. ४–१०–८४ – श्री साईबाबांचा ६६ वा पुण्यतिथी उत्सव सोहळा.
– साईभक्त श्री. भाऊ डिचोलकर यांचे भिक्षा पर्यटन.

मंगळवार दि. ९–१०–८४ – महाप्रसाद कोजागिरी पौर्णिमा उत्सव.

**दर दिवशी** — शिरडीप्रमाणे दैनंदिन विधी, होम हवन, सामुदायिक अभिषेक, श्री साई सच्चरित पारायण, श्री सत्यनारायणाची महापूजा, हळदीकुंकू समारंभ, कलाकारांची हजेरी, किर्तन, इत्यादि.

**कार्यक्रमाचा तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.**

# साईबाबांची प्रार्थना

दीनदयाळा कृपासागरा
भक्तवत्सला साईनाथा
कां न करिसी कृपा मजवरी
कां न जाणिसी माझ्या व्यथा ? ॥१॥

दुःख हरिले कैकांचे तू
मार्ग दाविला तू सकलांना
निरसन केलें तुवां जयांचे
धरिला होता अभिमान वृथा ॥२॥

चमत्कार तू करून दाविले
हलके केले दुःख जनांचे
केलें तू भयमुक्त जयांना
ठेविती जे तव चरणीं माथा ॥३॥

मंदिरीं असशी असशी मशिदींत
भेदभाव तुजपाशी नसे तो
कृपा छत्र तव असे तयांवरी
अनुसरती ज तव पंथा ॥४॥

भरली तू झोळी इतरांची
मला मात्र कां डाहेरिलें ?
भक्तीभावें तुज आळवितों परि
तव कृपा न लाभे मज अनाथा ॥५॥

केला असता अनुग्रह मजवरी
दिली असती अन् बुद्धी मजला
रचिले असते तव अभंग
आणि रचिली असती गाथा ॥६॥

—श्री. सूर्यकांत स. मयेकर
५५।१९६६, टिळक नगर, चेम्बूर
मुंबई ४०० ०८९.




प्रत्येक गाढ्या पंडिताच्या मागे महिनोन्
महिने, वर्षानुवर्षे केलेला अभ्यास
व व्यासंग उभा असतो. त्याचप्रमाणे
प्रत्येक लक्षाधीशामागेसुद्धा कित्येक
महिन्यांची किंवा वर्षांची बचत
व गुंतवणूक उभी असते.

सेंट्रल बँक
ऑफ इंडिया
(भारत सरकारचा उपक्रम)
एकमेका समवेत सुखी जीवन साकार

# जगाचे अधिपती

गरिब फकिरी । लेणे तुमचे,
जरी हे दारिद्रयाचे ।
समर्थ साई । सद्गुरू तुम्ही
अधिपती हो जगताचे ।।धृ।।

विविध धर्म पंथातच केली ।
ख्याती अद्भुत ऐसे व्यापिली ।।
पराकष्टे तुम्ही एकी साधली ।
गूढच बनुनी शास्त्रांचे ।।१।।

दशावतारा तुम्ही घेऊनी ।
तारित आला हीच मेदिनी ।।
पाळित आता युगायुगातुनी ।
रक्षीत ब्रिद स्वतःचे ।।२।।

पुराण अन् कुराण ग्रंथ सजविला ।
गीतामृत हा तुम्ही पाजला ।।
तुम्ही रहस्य उकलण्या जिवाला ।
ज्ञानेश्वर ज्ञानांचे ।।३।।

—श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

# 'सबका मालिक एक'

"सबका मालिक एक" कहते है बाबा साई
ध्यानसे अर्थ समझ लो मेरे प्यारे भाई।।
शिर्डीका है फकीर, नहीं जानता जाती
हिन्दू, मुस्लीम, सीख, ईसाई मानते है बाबा साई।।
हिन्दू का है रामसाई, मुस्लीम का है रहीमसाई
सीख ईसाई देखते हैं मन मन्दीरमें साई।।
मानव जाती एक है बोलते है बाबासाई
मतलब इसका जान लो मेरे प्यारे भाई।।
उच्च-नीच भेदभाव की दूर करो परछाई
अल्ला मालिक देख सकोगे तब प्यारे भाई ।।

—सौ. भावना दामोदर जेऊरकर,
१०, साईधाम, नाना शंकरशेठ रोड,
गोपी टॉकीज समोर, विष्णू नगर
डोंबिवली (पश्चिम.)

## श्री. मनोहर सावंत परदेश दौऱ्यावर

श्री साईबाबांचे एक जुने भक्त व साईलीला मासिकात वेळोवेळी आपले अनुभव प्रसिद्धीला पाठविणारे श्री. मनोहर नागेशराव सावंत हे शनिवार ता. ४ ऑगस्ट ८४ रोजी सकाळच्या गल्फ एअर विमानाने परदेश दौऱ्यावर गेले. या दौऱ्यात ते सपत्नीक जर्मनी, इटली, फ्रान्स, स्विझरलंड, इंग्लड, हॉलंड, बेल्जीयम, व अरेबियन गल्फ या देशातील प्रमुख शहरांना भेटी देऊन तेथील प्रेक्षणीय ठिकाणे पाहणार आहेत. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात ते मायदेशी परततील.

शिर्डी संस्थानचे माजी कार्यकारी विश्वस्त कै. नागेशराव सावंत यांचे श्री. मनोहर हे जेष्ठ चिरंजीव होत. श्री. मनोहर सावंत या उभयतांना त्यांच्या परदेश दौऱ्याबाबत आमच्या हार्दिक शुभेच्छा

# शिरडी वृत्त–माहे जून १९८४

जून महिन्यामध्ये बाहेरगावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पहिला पंधरवडयात जास्त प्रमाणात होती. त्यानंतर गर्दीचे प्रमाण थोडे कमी झाले. काही कलाकारांनी श्री चे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे

कीर्तन १ ह. भ. प. लक्ष्मण आनंदा मिरजकर.
२ ह. भ. प. दशरथ आप्पाजी उकीरडे.
३ ह. भ. प. परमेश्वर त्रिंबकराव झिंगे मठ पिंपळगांव
४ ह. भ. प. प्रल्हाद का. चव्हाण आळंदीकर वडांगळी.
५ ह. भ. प. मधुकर गणेश सुर्यवंशी निफाड.
६ ह. भ. प. भक्तराज ज्ञानोबा भोसले खपाट पिंपरी.
७ ह. भ. प. रमाबाई मुळे मु पो. नेर.

प्रवचन ह. भ. प. मुरलीधर महाराज देशमूख शिर्डी
२ श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे शिर्डी.

भजन, गायन, वादन, वगैरे १. श्री दत्तात्रय तुकाराम दयाळ सातारा २. मीरा राव भोपाळ. ३. श्री. दत्तात्रय लक्ष्मण साखरे वसई ४. श्री. मल्हार भजनी मंडळ इंदोर ५. श्री जयवंत कुलकर्णी मुंबई ६. श्री लक्ष्मण देवासकर मुंबई ७. श्री. शाहू भोसले ८. श्री. दौलत शर्मा मुंबई ९. कौसल्या चमनलाल चोपडा १०. श्री. सुभाष सानारकर पनवेल ११. श्री. महादेव वाघ पनवेल १२. श्री. हरिश्चंद्र पनवेल १३. श्री. मुकुंद किरजत १४. दिनानाथ ठाकरे नागपूर, १५. सौ. सुनंदा ग. केळकर सांगली १६. शकुंतला मुजूमदार, सांगली १७. श्री. भानुदासबुवा गुरव मिरज १८. श्रीमती विजयाबाई मदुरा १९. हरि ओम शरन २०. सौ. नंदिनी शरन २१. श्री. उमाशंकर, अदलाबाद २२. सौ. ताराबाई यरडूर पुणे २३. श्री. वसंत यरडूर पुणे २४. श्री. रतनलाल शर्मा, धंतोली २५. श्री. शांती मुदलीयार जमशेदपूर २६. श्री. बाळकृष्ण सुकदेव पाटील, वडांगळी २७. श्री. भगवती साई संस्थान कुर्ला २८. श्री. श्रीकांत दामोदर जेऊरकर २९. कु. मुग्धा दामोदर जेऊरकर.

हवापाणी–शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाला सुरवात झालेली आहे.

※ ※

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ६–०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३–५० | ४–०० |
| ३) | ,, | हिंदी | १२–०० | ४–०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२–०० | ४–०० |
| ५) | ,, | कन्नड | १०–०० | ४–०० |
| ६) | ,, | तेलगू | १३–०० | ४–०० |
| ७) | ,, | तामीळ | १२–०० | ४–६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–०० |
| ९) | ,, | हिंदी | ७–०० | ३–५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४–२५ | ३–०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०–३० | ३–०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०–५० | ३–०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १–७५ | ३–०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १–५० | ३–०० |
| २६) | ,, | हिंदी | १–७५ | ३–०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३–०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०–०० प्रत्येकी प्रत १–००

(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | बिल्ला | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पञ्याचे कॅलेंडर | – – – | १६–०० | ८–०० |

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, **संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे,** साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.